# 3.3.2.1 Research Paper Published in UGC Care Listed Journals

# साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातून प्रतिबिंबीत झालेले 'मारोती' या ग्रामदैवताचे चित्रण

प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री ता. साक्री, जि. धुळे. पिन. ४२४३०४

## प्रास्ताविक

साक्री तालुक्यातील अशिक्षित लोकांच्या दैनंदिन बोलल्या जाणाऱ्या अहिराणी बोलीत 'ओवीगीतांचे' समृध्द दालन आहे. ओव्यांतून लोकजीवनाचे दर्शन घडते. या ओव्यांच्या निर्मीतीत अशिक्षित स्त्रीयांचा मोठा वाटा आहे. ओवीरुपी हे स्त्रीधन अशिक्षित स्त्रीयांनी मौखिक परंपरेने आजदेखील जतन केलेले आहे. या ओव्यातून स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंवर जसा प्रकाश टाकलेला आहे, मानवी विविध नात्यांना या ओव्यांमध्ये जसे विशिष्ट स्थान आहे तसेच गावखेडयातल्या संस्कृतीत मनोभावे पुजल्या जाणाऱ्या विविध देवदैवतांचेही वर्णन केलेले आहे.

प्रत्येक खेडयात ज्या देवाला अढळ स्थान आहे तो देव म्हणजे मारोती होय. या देवाची मारोती, हनुमान, बजरंगबली, अशी वेगवेगळी नावे आहेत. ग्रामसंस्कृतीत मारोती देवा बद्दलच्या अनेक कथा, आख्यायिका सांगितल्या जातात. त्याला अवतार मानतात. शनिवार हा त्याचा जन्मवार असल्यामुळे त्यादिवशी गावातीले भाविक त्याची मनोभावे पूजा करतात. शेंदूर लावून रुईच्या पानाफुलांच्या माळा गळयात घालून मीठ व उडीदाचे दाणे अर्पण करतात. तो बलवान असून श्रीरामाचा सेवक आहे. माता अंजनीचा अविवाहीत पूत्र आहे. गावाचे संरक्षण करणारा हा देव असल्यामुळे त्याचे मंदिर गावाच्या जवळ असते अशा या श्रीराम भक्ताने जन्मापासूनच केलेल्या पराक्रमाचे गुणगान आजही खेडयातल्या अशिक्षित स्त्रीया ओव्यातून गातांना दिसतात. त्याला साक्री तालुक्यातील अशिक्षित स्त्रीयाही अपवाद नाहीत.

खेडयातील स्त्री–पुरुष सकाळी उठल्या उठल्या स्नानसंध्या झाल्यावर सूर्यदेवाचे दर्शन घेतात. त्याला पाण्याचे अर्ध्य देवून पाणी घालतात व आपल्या दिवसाची सुरुवात करतात. त्यावेळेस ती अशिक्षित स्त्री पुढील ओवी म्हणते–

"सकाय उठूनी उघाडू कवाडनी कडी
रामरायानं दर्सन तुयसाबाई नजरे पडी"

माता अंजनीच्या पोटी देव मारोतीचा जन्म कोणत्या तिथीला व वाराला झाला ते ती पुढील ओव्यांतून सांगते–

"बारा वर्षे तप माता अंजनी गरभार
देव मारोती जलमला चैत–पुनवेना सनिवार"

देव मारोतीचा जन्म कुठे झाला हे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"बारा वर्षे तप माता अंजनी रागात
देव मारोती जलमला राम तुयसीना बागात"

देव मारोतीचा जन्म कोणत्या वेळी झाला ते ती पुढील ओव्यांतून सांगते–

"माता अंजनी बाईनी तप कयं राने माये
देव मारोती जलमला काकड आरतीना येये"

हा मारोतीराया जन्मल्यावर आकाशातील सूर्याला धरायला चालला होता. बालपणापासूनच हा फार हट्टी होता आणि छंदी सूर्य याला धरता आला नाही म्हणून यानेच सूर्याकडे पाट फिरवली. त्याचे दर्शन घेणे टाळले म्हणून प्रत्येक गावातील मंदिर हे पश्चिममुखी असते. व त्याची मुर्तीही पश्चिममुखीच बसविलेली असते. हे सांगतांना ती म्हणते–

"देव मारोती रे राया तू ते भारी छंदीखोर
सुऱ्याले पाटकरी बांधं यानी घर"

श्रीरामाचा हा भक्त अतिशय बलवान होता तो सर्व मानवाचा उपकर्ता आहे. तो भावाचा भेव्हा आहे. तो जेव्हा द्रोणागिरी पर्वत लंकेला घेवुन चालला होता तेव्हा भरताच्या बाणाने त्याच्या पायास जखम झाली तेव्हा ती जखम तेल व शेंदूर लावून बरी झाली म्हणून मारोतीस प्रत्येक भक्त तेल चढवतो व शेंदूर लावत असतो ही आख्यायीका पुढील ओव्यांतून ती स्त्री सांगते–

"देव मारोती रे राया तू ते भावना से भेव्हा
तुले चढती तेल शेंदूरन्या फुडया"

अशा या बलशाली मारोतीरायाने आपल्या शक्तीच्या बळावर द्रोणागिरी पर्वत एका हातावर उचलून आणल्याचे पुढील ओव्यांतून ती स्त्री सांगते–

"माता अंजनीना पोटे देव मारोती मोठा बायी
आनला द्रोणागिरी त्यहाती एक पायी"

हा मारोतीराया कसा दिसतो याचे वर्णन ती पुढील ओव्यांतून करते–

"दूरथीन दखू देव मारोती दिसे काया
भाऊ करे सेवा हाती लवंगन्या माया"

बलवान अशा ह्या मारोतीरायाच्या हातात गदा व गळ्यात रुईच्या पानाफुलांची माळ कशी शोभून दिसते याबद्दल ती स्त्री सांगते–

"अंजनी व माता बयारी तुना बाय
हाती शोभस गदा गयामा रुईनी माय"

हा अंजनीचा पूत्र मारोती जन्मभर कुवारा असल्याचे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"सकाय उठून झाडू देवना देव्हारा
माता अंजनीना पोटे देव मोरोती कुवारा"

खेडयापाडयातील देवभोळया लोकांच्या मनामध्ये देव देवतांबद्दल अपार श्रध्दा असते. कोणत्याही देवाचे मंदिर दिसले की आपले दोन्ही हात त्या देवांचा पाया पडायला एकत्र येतात आणि मान आपोआपच खाली झुकते. गावागावात मारोतीरायाचे मंदिर आयाबाया सकाळी पाणी भरायला जातात त्या रस्त्यावरच आहे पाणी भरायला गेलेल्या स्त्रीच्या डोक्यावर पाण्याने भरलेली घागर आहे दोन्ही हात त्या घागरीला लावलेले आहेत म्हणून देवा तुझा पाया मी कशी पडू? हे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"देव मारोती रे राया तू ते पानीना सगरले
कशी पडू पाय दोन्ही हात घागरले"

नदीवर धुनं धुवायला जाणारी स्त्री देखील मारोतीरायाला सांगते की,

"देव मारोती रे राया तुनं वाटवर ठानं
कशी पडू पाय मना डोकावर धोनं"

ज्यावेळी सीतामातेला रावण लंकेत पळवून घेवून गेला त्यावेळेस रामभक्त हनुमानाला हे कळले तेव्हा तो सीतामातेला रावणच्या तावडीतून सोडवण्यासाठी लंकेत कसा गेला हे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"बारा वर्षे तप माता अंजनी उपासी
मारुनी ऊडांग गेला मारोती लंकेसी"

रामभक्त हनुमानाने जेव्हा रावणाची लंका जाळली तेव्हा या बलवान हनुमानाचा सर्वत्र जयजयकार होतो अशा सोन्यासारख्या मारोतीचे मंदिर मोती पोवळयांनी बांधा असेही ती पुढील ओव्यांतून सांगते–

"पयली व्हईना जयजयकार, पयली व्हईना जयजयकार
सोना रुपाना मारोती, मोती पवयाना बांधा पार"

...पहिले नामस्मरण करु आणि दुसरे मारोतीरायाचे नामस्मरण करु असे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"व्हई गाऊ पयली रामले, व्हई गाऊ पयली रामले
दुसरी गाऊ व्हयी, मना दौलत खामले"

... या रामभक्त महाबली हनुमानाचे दर्शन खेडयातील लोकं सकाळी सकाळी घेतात कारण आपला दिवस चांगला ... त्यामागची भावना असते. हे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"सकाय ऊठी मना लेक येसीनीकडे गया
पयला नमस्कार त्यानी देव मारोतीले कया"

... पुढच्या ओव्यांमध्ये म्हणते की, मुरदाड मानसाचं दर्शन घेण्यापेक्षा महाबली हनुमानाचं दर्शन घेतल्यावर आणि ... अंगी एक वेगळी प्रेरणा संचारत असते कारण तो सर्वश्रेष्ठ असा देव आहे म्हणून मी देखील मारोतीरायाच ... असे ती पुढील ओव्यांतून सांगते–

"माले नई लनं, मानोस मुरदारनं
आसी लनं लिऊ, देव मारोती सरदारनं
माले नई लनं, लनं लिऊ दगडनं
आसी लनं लिऊ, देव मारोती सुगडन"

... प्रकारे साक्री तालुक्यातील अशिक्षित देवभोळया स्त्रीया आजही अहिराणी बोलीच्या ओव्यांतून गावाचा रक्षणकर्ता, ... असलेला सच्चा श्रीराम भक्त अंजनीसूत हनुमानाचे जन्मापासून ते त्याच्या विविध पराक्रमाविषयीची महती आपल्या ... दिसतात.

...सूची –

...मती मंदोदरबाई श्रीराम साळुंके, मु. पो. शेवाळी, ता. साक्री, जि. धुळे.

Drishtikon
(UGC Care Journal)

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

# जागतिकीकरण आणि मराठी कविता

डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके

मराठी विभाग प्रमुख

सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री.

जि. धुळे

**Abstract:-**

जागतिकीकरण आणि मराठी कविता या शोधनिबंधात जागतिकीकरण या संकल्पनेविषयी माहिती, नव्वदोत्तर कालखंडात उदयाला आलेल्या जागतिकीकरण खाजगीकरण आणि उदारीकरण ह्या त्रीसुत्रीचा समाजजीवनावर पडलेल्या प्रभावाबरोबरच मानवी संस्कृतीच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र रेखाटलेले असून बदलते खेडे व महानगरीय जीवन-जाणीवा,माहिती आणि तंत्रज्ञानाचा प्रचंड वापर, बहुराष्ट्रीय कंपन्याचे वाढत जाणारे वर्चस्व, कृषीसंस्कृतीचा ऱ्हास,मानवी मूल्यांचे अवमूल्यन,चंगळवादी वृत्ती अशा सर्व बाबींचा मराठी कवितेवर कसा प्रभाव पडला ? तो मराठी कवितेतून कसा साकार झाला या संबधी विचार मांडलेला आहे,हे करतांना मराठी कवींच्या कवितेतील जागतिकीकरनाच्या बाबतीतल्या काही महत्वाच्या निवडक ओवी, त्यांचे विश्लेषण,समारोप,निष्कर्ष आणि संदर्भसूची देण्यात आलेली आहे.

**बिजशब्द (Key Words) :-** जागतिकीकरण संकल्पना, नव्वदोत्तर कालखंड, बदलते भावविश्व,महानगरीय जीवन,सायबर जग.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

**प्रस्तावना :-**

विसाव्या शतकाच्या अखेरच्या कालखंडातील एक महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून जागतिकीकरणाचा उल्लेख केला जातो.जागतिकीकरण,खाजगीकरण आणि उदारीकरण याविषयीची चर्चा १९९१ पासून होऊ लागली.जागतिकीकरण,खाजगीकरण प्रभाव जगातील सर्वच राष्ट्रांवर पडलेला आहे.आपल्या भारत देशातही तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ.मनमोहनसिंग यांच्या पुढाकाराने भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले.त्यात जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण ह्या त्रिसूत्रीचा स्वीकर करण्यात आला.जागतिकीकरण आज काळाची गरज बनली आहे. प्रवास साधनांच्या क्षेत्रातील क्रांती व माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट यामुळे संपूर्ण जग एकत्र  येणे अटळ बनले आहे.

जागतिकीकरणामुळे भांडवली अर्थव्यवस्था आणि आधुनिक जीवनमानाची नवी परिमाणे निर्माण झालीत.संपूर्ण जग हा एक मुक्त बाजारपेठ बनली.विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे नवनवे शोध आणि त्यांचा मानवी जीवनावरील प्रभाव वाढला.नवी विचार प्रणाली, बदलती मूल्यव्यवस्था  आणि विकासाचे नवे सिद्धांत यांचा  मानवी जीवनावरील प्रभाव वाढला.नवीन विचारप्रणाली, बदलते मूल्यव्यवस्था आणि विकासाचे नवे सिद्धांत यांचा मानवी जीवनावर प्रभाव पडू लागला. जागतिकीकरणात पैसा हा जगण्याचा मूलाधार बनला.पैसा मिळवण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा मानस अवलंब करू लागली.त्यातून जगण्याची शैली बदललली.सुखवाद व चंगळवादाने माणसाला घेरले.जागतिकीकरण हे खाजगीकरणाला प्राधान्य देणारे असल्याने भांडवलदारांसाठी ही एक पर्वणी ठरली असून सर्वसामान्यांसाठी मात्र शाप ठरला आहे. जागतिकीकरण आज फक्त आर्थिक क्षेत्रापुरतेच मर्यादित न राहता सामाजिक, राजकीय,सांकृतिक व साहित्यिक क्षेत्र ही त्याने काबीज केले आणि ग्लोबल सांस्कृतिच्या नावाखाली संस्कृतीचे विकृतीकरण सुरु

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

झाले. पाश्चात्य वेषभूषेने आज संपूर्ण युवावर्गाला आपल्या कवेत घेतले आहे.संगीत व कला क्षेत्रासाठी संपूर्ण विश्व हे व्यासपीठ बनले आहे. या सर्व बाबींचा प्रभाव मराठी कवितेवरही पडलेला असल्यामुळे मराठीतील अनेक सर्जनशील व संवेदशील साहित्यिकांच्या लेखणीतून जागतिकीकरणाचा मानवी जीवनावर पडलेला प्रभाव आपल्या साहित्यात दिसून येतो. त्याला 'कविता' हा साहित्य प्रकारही अपवाद नाही.

**जागतिकीकरणाचा मराठी कवितेवर झालेला परिणाम :-**

नव्वदोत्तर कालखंडातील मराठी कवितेला जागतिकीकरणाचा संदर्भ आहे. माणसाच्या भाव-भावना-संवेदना,विचार,जीवनविषयक जाणीवा,नवी दृष्टी, नाते संबध आदि बाबींकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आणि हेच बदलते भावविश्व कवी सुनील अवचार,अरुण काळे, उत्तम कांबळे,महेद्र भवरे,इंद्रजीत भालेराव, हेमंत दिवटे,मंगेश काळे,संतोष पवार,भुजंग मेश्राम,अशोक कोतवाल, अशोक इंगळे,श्रीकांत देशमुख,पी.विठ्ठल,प्रज्ञा लोखंडे,कविता महाजन,पद्मा गोळे आदि कवी कवयित्रींचं कवितांमधून पप्रकर्षाने प्रकटलेले आहे.

माहिती आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले मात्र माणूस माणसापासून दूर जातो आहे. मानवी भाव-भावना-संवेदना बोथट झाल्या असून मानवी संस्कृतीचेही बाजारीकरण होत आहे.नव्या साम्राज्यशाही धोरणांच्या मायावी षडयंतत्रात महानगरे कशी सामील झाली आहेत हे बदलते भावविश्व कवी सुनील अवचारांनी आपल्या कवितेतून अचूक टिपले आहे.-

"या ग्लोबल वर्तमानात भावना झाली आहे जाहिरात

आणि मेंदूचे झाले आहे कॉम्पुटर,

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

तंत्रज्ञान झाले आहे युज अंड थ्रो

संस्कृती झाली आहे रखेल..."

महानगरीय जाणीवा बदलल्यामुळे जागतिकीकरणात मानवी भाव-भावनेला किंमत राहिलेली नाही.मानवी मेंदू कॉम्पुटर प्रमाणे वागतांना दिसतो. मात्र त्यामुळे माणसाचे तत्रज्ञान आज युज अँड थ्रो वाटू लागले आहे. या तत्राज्ञामुळे मानवी संस्कृतीची जागा विकृतीने घेतली आहे.जणू ही संस्कृती बहुराष्ट्रीय कंपन्याची रखेल झाल्याचे कवीला वाटते.

कवी अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहामधून जागतिकीकरणाचे प्रतिबिंब नेमकेपणाने प्रतिबिंबीत झालेले आहे.आपल्या कवितेत नव्या प्रतिमासृष्टीचा वापर करून 'खाउजा' संस्कृतीचे महाभयंकर संकट त्यांनी अधोरोलेखीत केले आहे.-

"जे बळी तुरुंगाच्या स्फोटाचे

तेच बळी माहितीच्या स्फोटाचे

हे बदललेले फॉर्म जातीय द्वेषाचे

हे विषाणू बहुजन हिताचा प्रोग्राम नष्ट करणारे

हे जागतिकीकरण" (नंतर आलेले लोक पृ.१२)

कवी अरुण काळे यांनी आपल्या कवितेत वरीलप्रमाणे संगणक क्रांती,तंत्रज्ञान युगाची परिभाषा योजून वर्तमानात माणूस संगणकाचा उपयोग मोठ्या प्रमाणवर करू लागला.मात्र याच संगणकीय

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

कार्यप्रणालीत प्रोग्राम नष्ट करणारा 'विषाणू' असल्याचे सांगून तो 'विषाणू' समान्य माणसाच्या हिताआड येणारा असल्याचेही म्हटले आहे.

कवी अशोक कोतवाल यांच्या कवितेने जागतिकीकरण लोकशाही आणि संस्कृती यांच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र रेखाटले आहे. मधल्या सुटीत शाळेतून पळून जाणाऱ्या मुलांचे मन चित्रित करतांना कवी म्हणतात.-

"त्यांच्या लेखी शाळा होऊ शकत नाही! विरंगुळा

सायबर कॅफेतील

डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट कॉम व्हावी एक वेबसाईट शाळा"

(कुणीच कसे बोलत नाही पृ.२४ )

वर्तमान स्थितीत शाळेत शिकणाऱ्या मुलांचा कल शाळेऐवजी सायबर कॅफेकडे वळलेला आहे. कारण शाळेतील शिक्षणाच्या मनोरंजनापेक्षा सायबर कॅफेतील मनोरंजनात्मक शिक्षण मुलांना सहज अवगत होत असते म्हणून मुलांचा शाळेत जाण्याकडे ओढा निर्माण करण्यासाठी शाळाच एक वेबसाईट व्हावी अशी अपेक्षा कवी करतो.

कवी पी.विठ्ठल आपल्या कवितेतून महानगरीय जीवनाने एका विपरीत वळणावर मानवी जीवन आणून ठेवल्याचे तसेच संस्कृतीला निव्वळ मनोरंजनाच्या पातळीवर आणून ठेवल्याचे आणि हरवत चाललेल्या मानवी संवेदनांचे भाव व्यक्त करतात. पावलांचे ठसे,झाडाची सावली,गवताला फुटणारे कोवळे कोंब अशा मातीशी मानवाचे असलेले अतूट नाते सांभाळणाऱ्या गोष्टी नाहीशा झालेल्या आहेत असे

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

कवीला वाटते.मातीशी संवादी मानवी जीवनाचा आवाज ऐकू येत नाही म्हणून कवी व्यथित होतो आणि म्हणतो.-

"डोक्यावरून सळसळत धावतो फ्लायओव्हर

आणि गाडीच्या कर्णकर्कश

आवाजानं हृदयाचा सेन्सेक्स पार कोसळतो."

अशा प्रकारे कवीची अवस्था झाली आहे.महानगरीय भौतिक संपन्नतेतही अस्वस्थ असणारे हे कविमन महानगरीय जगण्याच्या सांस्कृतिक अंगोपांगाच्या नटव्या तऱ्हा पाहून अधिकच बेचैन झालेले आहे.-

"लेखक-बिखक,वही-पेन-पुस्तक

हवेयत कुणाला ?

हाउसफुल्ल मल्टीप्लेक्स, मॉल्स आणि

चायनीज डीशवर उडतोच पैशांचा पतंग"

महानगरीय जीवनाने संस्कृतीला निव्वळ मनोरंजनाच्या पातळीवर आणून ठेवल्यामुळे लेखक-बिखक, वही-पेन-पुस्तक हवेयत कुणाला? असा उद्विग्न प्रश्न कवी येथे उपस्थित करतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडून आलेला प्रचंड सामाजिक बदल आणि महानगरीय जीवन जाणिवेची घुसमट कवी महेंद्र भवरे आपल्या कवितेतून व्यक्त करतात.माहिती आणि तंत्रज्ञानाच्या प्रचंड

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

वापरामुळे महानगरीय जीवनात प्रचंड उलथापालथ घडून आलेली आहे.महानगरातला माणूस व्यक्ती केंद्रित बनला त्यामुळे त्याची नजर फायबर ग्लासाकडून सायबर जगाकडे वळलेली दिसते. इथे माणसाकडे ग्राहक म्हणून बघितले जाते त्यामुळे मानवी मूल्यांचे अवमूल्यन घडत असल्यामुळे या युगाला ते 'पत्थरदिल युग संबोधतात -

"फायबर ग्लास्कडून सायबर न्याहळणारी नजर

नपुंसक जगावर घालते दगड

पर्थरदिल युगाच्या आधुनिक वळणावर

थबकते जाग्यावर"

महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात होणाऱ्या बदलांचा आणि त्यातील वेगवेगळ्या अवस्थांचा वेध  कवी महेंद्र भावरे आपल्या कवितेतून घेतात.

कवी हेमंत दिवटेच्या कवितेतही महानगरीय जाणिवेचाच आविष्कार आहे. शहरी माणसाच्या गर्दीत माणुसकी सापडणे कठीण झाले आहे . चंगळवादी संस्कृती उदयास आली असून माणसाने आपल्या जीवन जाणीवा बदललेल्या आहेत.पप्रत्येक्ष वस्तूंपेक्षा वस्तूंच्या जाहिरातींवरच  माणसाचा जास्त विश्वास आहे. म्हनूनच आपल्या कवितेत त्यांनी जागतिकीकरणातील जाहिरातींच्या भाषेचा अशशयाभिव्यक्तीसाठी चांगला वापर केला आहे  'मेगामॉल शॉपिंग' या कवितेतून त्याचा प्रत्यय येतो

"तर या मेगा शॉपिंग मॉलमध्ये शॉप करतांना

अतिमायक्रो विचार येत राहतात .........

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

जसं की मी आहे पहिल्या रॅकमधला

व्हीसपर नॅपकीन पॅक

नेक्स्ट रॅकमधला हग्गीचा पॅक बनून मी

कुठल्याही बाळाचं मलमूत्र साचवून ठेवतोय"

(थांबताच येत नाही पृ.७)

याच कवितेत कवीने स्वतःला व्हीसपर नॅपकीन,हग्गीचा पॅक असे संबोधले असून आपण असाचवर्गीयांच्या उपभोगाची वस्तू असल्यची खंत व्यक्त केली आहे.

कवी उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरणामुळे आर्थिक,समाजिक,सांस्कृतिक स्तरावर घडून येत असलेल्या दुष्परिणामापेक्षा कृषीसंस्कृतीवरझालेले दुष्परिणाम किती दूरगामी स्वरूपाचे आहेत ते त्यांच्या पुढील ओव्यांमधून जाणवते –

"शेताच्या काळजावरील

असंख्य भेगांवर अश्रू गाळत

बांधांवरून फिरणारी माझी कविता

जागतिकीकरणाच्या लाटेत

हातातून निसटणारी सबसिडी

गच्च पकडण्याचा प्रयत्न करीत होती."

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

(जागतिकीकरणात माझी कविता पृ.८८)

सदर ओळींमधून कवी उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरणामुळे कृषीसंस्कृतीवर किती दूरगामी परिणाम झाले आहेत त्याचे वास्तव चित्रण केले आहे.

कवी अशोक इंगळे आपल्या कवितेतून जागतिकीकरणामुळे बदललेले नागरी वास्तव चितारतात.जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनातही कसे परिवर्तन घडून येत आहे. आज खेडे बदलले आहे मात्र हे बदल मानवी नात्यांची घडी विस्कटून टाकणारे आहेत. ग्रामीण भागातही पैसे कमवण्याची जणू शर्यतच लागलेली आहे. कोणत्याका मार्गाने असेना पैसा आला पाहिजे असा ग्रामसमज निर्माण झालेला आहे.'गावाच्या ईस्टट प्रगतीसाठी' या कवितेत त्यांनी जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनात कसे परिवर्तन झालेले आहे ते अतिशय मार्मिक शब्दात मांडलेले आहे.-

"आताशा गावाला जडलाय रोग

जमीन एन.ए.करून घेण्याचा

प्लॉट पाडून विकण्याचा

पोल्ट्रीफॉर्म, धाबा टाकण्याचा इस्टट प्रगतीचा

महासत्तेच्या स्पर्धेत धावण्यासाठी गावाने पकडलाय वेग कालीपिलीचा

म्हणून गावाच्या उत्पनाचा आलेख झळकतो.

डिजिटल पोस्टर्सच्या होल्डिंगवर...."

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

(गावाच्या इस्टट प्रगतीसाठी काव्यसंग्रह 2013 पृ.६७)

अशा प्रकारे ग्रामजीवनातही स्वतःच्या काळ्या आईला (शेतीला)विकून त्या जागेवर प्लॉट पाडणे,हॉटेल टाकणे,पोल्ट्रीफॉर्म टाकणे आदि वेगवेगळ्या गोष्टीतून पैसा कमवण्याची चढाओढ चालल्याचे दिसून येते. मात्र गावाची ही प्रगती दिखाऊ असल्याचे कवी म्हणतात. कवी कालीपिलीच्या वेगाशी गावाच्या प्रगतीच्या वेगाची तुलना करतात. मात्र कालीपिली ही केव्हाही कुठेही बंद पडू शकते तसा गावाच्या विकासाचा वेगही केव्हाही मंदाऊ शकतो याचे सूचनाही कवी करतात.नुसत्याच पोष्टरवर फोटो झळकल्याने आपले कर्तृत्व सिद्ध होत नसल्याचेही ते सांगतात म्हणजे जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनातही अशा प्रकारे बदल घडत असल्याचे उपहासात्मक मत कवी व्यक्त करतात.

**समारोप :-**

अशा प्रकारे नव्वदोत्तर कालखंडात उदयास आलेल्या जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या त्रिसूत्रीचा समाजजीवनाबरोबरच मानवी संस्कृतीच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र मराठी कवितेत रेखाटलेले असून गाव-शहरांचे बदलते स्वरूप, तेथील जीवन-जाणीवा,माहिती तंत्रज्ञानाचा प्रचंड वाढता वापर,बहुराष्ट्रीय कंपन्याचे वाढत जाणारे वर्चस्व,कृषीसंस्कृतीचा ऱ्हास, मानवी मूल्यांचे अवमूल्यन,तेथील एकाकीपणा,बोथट संवेदना, स्वार्थीवृत्ती,यांत्रिकता,मूल्यशून्यता,चंगळवादी वृत्ती,संस्कृतीचे बाजारीकरण,विकृतीकरण आणि सामाजिक बदलांचा वेध मराठी कवींनी आपल्या कवितांमधून समर्थपणे घेतला आहे.

**निष्कर्ष :-**

१) नव्वदोत्तर मराठी कविता ही जागतिकीकरणाच्या परिणामांचा वेध धेणारी कविता आहे.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

२) जागतिकीकरणामुळे मराठी कवितेचे आशयविश्व बदलले.

३) मानवी मम मुल्यांची घसरण व माणसा-माणसातील दुरावा यांचे वेधक चित्रण मराठी कवितेत चित्रित झालेले आहे.

४) विदेशी संस्कृती व सायबरचे जग यामुळे मानवी नवी पिढी उध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याचा इशारा मराठी कविता देत आहे.

५) जागतिकीकरणामुळे कृषीसंस्कृती,सामाजिक व सांस्कृतिक नितीमूल्य यांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याची जाणीव मराठी कवितेने अधोरेखित केली आहे.

**संदर्भ :-**

१) अवचार सुनील-'ग्लोबल वर्तमानाच्या कविता' दत्ता प्रकाशन अमरावती.पृ.९

२) Awachar Sunil- 'Poetry Against Human Injustice' पृ. १ ते ८

३) गोविलकर लीला- 'अनिवार्य मराठी' के.सागर पुबिकेशन्स पुणे. पृ.७३,७४

४) जाधव मा.मा.(संपा दक) 'अक्षरगाथा' ऑक्टोबर २०११ मधील. डॉ.अशोक इंगळे यांचा लेख पृ.43 ते 52

५) पाटील व्ही,बी.'मानवी हक्क' के.सागर पब्लिकेशन्स पुणे पृ. ३१५,३३८

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

६) सुरवाडे मोहन 'ग्रामीण साहित्य प्रकार स्वरूप आणि चिकित्सा' सुगम प्रकाशन अमरावती पृ. १८१ ते १८३

७) मराठी अभ्यास मंडळ कबचौ उमवि जळगाव (संपादन) 'काव्यांकुर'- प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव. पृ.५५,५६

८) वले वसुदेव (संपादक) 'जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव' मधील डॉ. अशोक इंगळे यांचा लेख पृ.२७४ ते २८१

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

जसं की मी आहे पहिल्या रॅकमधला

व्हीसपर नॅपकीन पॅक

नेक्स्ट रॅकमधला हग्गीचा पॅक बनून मी

कुठल्याही बाळाचं मलमूत्र साचवून ठेवतोय"

(थांबताच येत नाही पृ.७)

याच कवितेत कवीने स्वतःला व्हीसपर नॅपकीन,हग्गीचा पॅक असे संबोधले असून आपण असाचवर्गीयांच्या उपभोगाची वस्तू असल्यची खंत व्यक्त केली आहे.

कवी उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरणामुळे आर्थिक,समाजिक,सांस्कृतिक स्तरावर घडून येत असलेल्या दुष्परिणामापेक्षा कृषीसंस्कृतीवरझालेले दुष्परिणाम किती दूरगामी स्वरूपाचे आहेत ते त्यांच्या पुढील ओव्यांमधून जाणवते –

"शेताच्या काळजावरील

असंख्य भेगांवर अश्रू गाळत

बांधांवरून फिरणारी माझी कविता

जागतिकीकरणाच्या लाटेत

हातातून निसटणारी सबसिडी

गच्च पकडण्याचा प्रयत्न करीत होती."

# 3.3.2.1 Research Paper Published in Peer Reviewed and Referred Journals

ISSN : 2348-7143
Dec. 2018

# पश्चिम खानदेशातल्या साक्री तालुक्यातील सण-उत्सव व त्यासंबंधीची अहिराणी बोलीतील ओवीगीते

प्रा.डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी.गो. पाटील महाविद्यालय,
साक्री, ता. साक्री, जि. धुळे.

**प्रस्तावना**

खानदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेला 'अहिराणी' या नावाने ओळखले जाते. अहिराणी ही खानदेशातील कष्टकरी लोकांची मायबोली आहे. ती सहित्याच्या सर्व अंगांनी समृध्द आहे. अहिराणी बोलीत विपुल असे लोकसाहित्य सामावलेले आहे. अहिराणी लोकसाहित्याचा उगम विविध सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीतून झालेला आहे. अहिराणी बोलीभाषेत मौखिक परंपरेने लोकगीते, लोककथा, म्हणी, वाकप्रचार, उखाणे यांचा जन्म होत राहिला व मानवी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत हा साहित्याचा ठेवा संक्रमीत होत राहीला. अहिराणी लोकांचे सहित्य देव- देवता, सण-उत्सव, रुढी-परंपरा यांच्या अनुषंगाने निर्माण होत राहिले. या साहित्याचा निर्माता कोणीएक असला तरी त्याला प्रातिनिधीक समजून समुहाचा शिक्का असल्यामुळे समुहाचे सहित्य म्हणून अहिराणी लोकसाहित्याचा उल्लेख करता येतो.

अहिराणी ओवीगीते रुढी परंपरेतून अविष्कृत झालेली आहेत. ही ओवीगीते जशी लोकदैवतांची आहेत तशीच लोकसण- उत्सवांच्या संबंधीचीही आहेत. कारण खानदेशात अनेक सण- उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले जातात. त्या सण -उत्सवांमधूनच खानदेशची सांस्कृतिक जडण- घडण झालेली आहे. हया सण–उत्सवांच्या वेळी आजही खानदेशात विविध लोकगीते–ओवीगीते म्हटली जातात. कारण ही ओवीगीते मानवी जीवनाच्या तालासुरांशी नातं जोडणारी आहेत. या ओवीगीतांनी विविध प्रकारचे अलंकार, रस, छंद, गंध, अर्थ त्यालेल्या आहे. त्यामुळे अहिराणी ओवीगीतांमध्ये एकप्रकारची गोडी असून त्यात प्रेम, जिव्हाळा, निर्मळपणा, विचार. भाव- भावना रिर्व्याजता असे अनेक गुण ओतप्रोत भरलेले आहेत. अहिराणी ओव्या म्हणजे खानदेशातील स्रीच्या मुखातून हदयाच्या [illegible] होत. हे शब्द विविध सण–उत्सवांच्या प्रसंगी आजही खानदेशातील स्रीच्या मुखातून आपोआपच ओवीरुपाने बाहेर [illegible] असतात.

**खानदेशातील सण–उत्सव**

खानदेशी जनता ही मुळातच देवभोळी व उत्सवप्रिय आहे.खानदेशात विविध सण– उत्सव मोठया प्रमाणात आनंदाणे व एकदिलाने साजरे केले जातात. त्यातूनच खानदेशच्या संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले आहे. माणूस समाजशील प्राणी आहे. चाकोरीबध्द जीवन जगत असतांना सर्वांना एकत्र येता यावं, थोड वेगळं जीवन जगता यावं, मन प्रसन्न, उत्साहीत व्हावं जगण्यासाठी नवी उर्जा मिळावी म्हणून वर्षभराच्या कालावधीत गुढीपाडव्या पासून तर थेट होळीपर्यंत विविध उत्सावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या [illegible] असताणे देखील विविध अहिराणी लोकगीतांची निर्मिती झालेली आहे. त्यात अक्षयतृतियेची गौराईची, गुलाबाईची, कानुबा [illegible] व पोळा सणांची ओवीगीते आढळून येतात. काही सण -उत्सावांची माहिती व त्यासंबंधीची ओवीगीते पुढीलप्रमाणे [illegible] आहेत.

**अक्षयतृतीया**

हा खानदेशातील महत्वाचा सण आहे. साडेतीन शुभ मुहुर्तांपैकी हा एक शुभ मुहुर्त मानला जातो. वैशाख शुदध् तृतीयेला हा सण येत असतो. या सणाला खानदेशातील स्त्रियांचे लोकदैवत असलेल्या गौराईची पूजा केली जाते. चैत्र महिण्याच्या चावदसला खानदेशात घरोघरी गौराईची मांडणी केली जाते. गौराई हे पार्वतीचे रुप मानले जाते सासुरवाशिनीला माहेरचे सुख , आनंद देणारी ही देवता आहे. या सणाच्या निमित्ताने सासुरवाशीण मुली माहेरी येतात. हा सण सासुरवाशीनीला प्रिय असतो. चैत्र पौर्णिमेपासून ते अक्षयतृतीया पर्यंत मुली व माहेर[illegible] झोक्यावर बसून गौराईची गाणी म्हणतात. फुगडया खेळतात. टिपऱ्या खेळतात. आखाजी सारखा सन–स[illegible] आखजी सणाचे गाणे गातात. खानदेशात अहिराणी बोलीभाषेत गौराईची गाणी विशेष प्रसिदध् आहेत जसे.–

*चैत्र वैशाखनं ऊनं व माय वैशाखनं ऊनं*
*खडक तापी झायात लाल व माय तापी झायात लाल*
*गौराईना पायले वनात फोड व माय पायले वनात फोडं*
*संकर निंघना घोडयावर व माय निंघना घोडयावर*
*मायले ठेवं फुलेस्वर व माय ठेवं फुलेस्वर*

आखाजीच्या सणाच्यावेळी सगळीकडे आनंदी आनंद आहे. अशा वातावरणात टिपऱ्या खेळण्यासाठा [illegible] स्त्रियांकडे विविध दागदागिन्यांची मागणी करीत आहे. अशा आशयाचे गाणे पुढील प्रमाणे–



Scanned by CamScanner

*उना आखाजीना सन वं माय केसर दणदणी*
*वहिणी तुमन्या बांगडया दिसात कावं माय केसर दणदणी*
*काकू तुमना कांकण दिसात कावं माय केसर दणदणी*

**कानुबाईमातेचा उत्सव**

कानुबाई ही खानदेशची प्रमुख लोकदेवता आहे. किंबहुना कानुबाईचा देश म्हणुन खानदेश ओळखला जातो. असा अभिप्राय सदाशी पगार यांनी मांडला आहे. महाराष्ट्रात खानदेश खेरीज कुठेही कानुबाईचा उत्सव साजरा केला जात नाही. शहादा तालुक्यातील ..., साक्री तालुक्यातील रुणमळी, बळसाणे आणि कासारे, चाळीगाव तालुक्यातील उंबरखेडे या गावांना कानुबाई मातेची मंदिरही आढळतात. श्रावण महिन्यात नागपंचमी नंतर येणाऱ्या रविवारी कानुबाईची स्थापना केली जाते व सोमवारी तिचे वाजत - गाजत नाचत विसर्जन केले जाते. कानुबाईचे 'रोट' खानदेशात प्रसीध्द आहेत. ती नवसाला पावणारी देवता आहे. अहिराणी बोलीभाषेत कानुबाईच्या गाण्यांचा मोठा खजीना आहे. कानुबाई माय आपल्या घरी कोणत्या रुपात आली आहे तो आशय स्पष्ट करणारे पुढील गीत-

*कसाना मिसे वनी वं मनी कानुबाईमाय –२*
*नारयना मिसे वनी वं मनी कानबाईमाय –२*
*माय तुनं शिर नारयन माय नारयनं –२*
*चौरंग बाजवर बसनी वं मनी कानबाईमाय–२*
*मंडप टाका द्राक्षसना माय द्राक्षसना –२*
*वाजा वाजे गुरवसना माय गुरवसना –२*

ही छोटीशी कानुबाई काय – काय करामत करते ते पुढील ओव्यातून लक्षात येते.

*एवढशी कानुबाई ठुमकनी माय ठुमकनी – २*
*कसाना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*नारयना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*खोयभर नारय तोडी लयनी माय तोडी लयनी –२*
*एवढशी कानुबाई ठुमकनी माय ठुमकनी ह् २*
*खारीकना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*खोरभर खारका तोडी लयनी माय तोडी लयनी –२*
*एवढशी कानुबाई ठुमकनी माय ठुमकनी –२*
*सोपारीना बनमा जाई पडनी माय जाई पडनी –२*
*खोयभर सोपाऱ्या तोडी लयनी माय तोडी लयनी –२*

अशा प्रकारची बहुतांश ओवीगीते कानुबाईच्या उत्सवाच्या वेळी गायली जातात.

**गुलाबाईचा उत्सव**

महाराष्ट्रात इतर ठीकाणी 'भुलाबाई' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या देवतेस खानदेशात 'गुलाबाई' म्हणतात. भाद्रपद पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत महिणाभर गुलाबाईचा उत्सव चालतो. शंकराची पत्नी पार्वती तीच गुलाबाई होय. गुलाबाई कुवाऱ्या मुलींची देवता आहे. गुलाबाईची गाणीही खानदेशात खुप प्रसिदध् आहेत.

*सा बाई सु, सा बाई सु*
*बेलाच्या झाडाखाली महादेव तू*
*हारं गुंप्पीला, वीडा रंगीला*
*गुलाबाचे फूल माझ्या गुलाबाईला*
*मोगऱ्याचे फूल माझ्या गुलाबाईला*
*जास्वंदीचे फूल माझ्या गुलाबाईला*

अशा प्रकारे प्रत्येक कडव्यात एका फुलाचा उच्चार करत तीण–चार कडव्यांचे गाणे गातात व फेर धरुन नाचतात आणि आपला आनंद व्यक्त करतात.

**पोळा**

पोळ्याचा सणही खानदेशातील महत्वाचा सण आहे. 'पोया आणि सन करे गोया' अशी एक म्हणच अहिराणी भाषेत प्रसिद्ध आहे



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
Dec. 2018

कारण पोळा हवा सणानंतरच सर्व सणांना सुरुवात होते कृषीसंस्कृतीशी तो सण निगडीत आहे व शेती कामासाठी लागणारे बैल हे शेतकऱ्यांचे दैवत आहेत त्या बैलांना पूजण्यासाठी वर्षातून एकदा कामातून विसावा देण्यासाठी 'बैलपोळा' हा सण साजरा केला जातो. बैल हा खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचा आसरा असतो तो वर्षभर शेतात राब –राब राबतो म्हणून पोळ्याच्या दिवशी त्याची देव म्हणून पूजा करून त्याला गोडधोड असा पुरणपोळीचा नैवद्य खायला घालून त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली जाते असा आशय पुढील ओवींतून व्यक्त होतो.–

*पोया पोया करु बैल कुनबीना आसरा*
*नंदीले ववायले, सन नहीना दुसरा*
*आज पोयानावं सन ,सासू पोटले कायीमायी*
*धवया पवया आज तुमले , कयी पुरननी पोयी*

वरील सणांप्रमाणेच गुढीपाडवा, गणपती, मकरसंक्रात, होळी आदि सणही खानदेशात साजरे केले जात[illegible] [illegible]गाणी म्हटली जातात.

अशा प्रकारे खानदेशात विविध सण–उत्सव अतिशय मनोभावे साजरे केले जातात व अहिराणी बोलीतील ओवीगीतातुन त्या सण-उत्सवा बद्दलची महती सांगीतली जाते त्यातून खरोखरच खानदेशची अहिराणी संस्कृती आपल्या दृष्टीस येते.

दसरा सण

दसरा हा सण खानदेशातला अतिशय आनंदाचा सण असतो दसऱ्याच्या आधी दहा दिवस देवांच्या रुपाने घट बसवले जातात व ते दसऱ्याच्या दिवशी उठवले जातात. दारात सडा– रांगोळी घातली जाते. खायला गोडधोड खानदेशचा खास आवडता मेन पुरणपोळीचा स्वयंपाक केला जातो. संध्याकाळी सर्वगावकरी मिळून सिमोल्लंघन करतात. रात्री घरोघरी एकमेकाच्या प्रेमाचे प्र[illegible] (त्या पानांना त्या दिवशी सोने म्हणतात ) वाटले जाते तेव्हा आपल्यापेक्षा मोठयांचा पाया पडून त्यांचा आशी[illegible]. त्या दिवशी सर्व लहान थोर मंडळी आनंदी असतात म्हणूनच त्या दिवशी, 'दसरा सण मोठा नाही आनंदाचा तोटा' असे म्हटले जाते व त्याचा प्रत्येक सर्वांना येत असतो त्या आशयाच्या अहिराणी ओव्या पुढील प्रमाणे–

*आज दसरा दसरा आज सन सिलांगन*
*दारी घाला वं रांगोया, सकाये सारा व आंगन*
*आज दसरा दसरा ,लुटा जिवशीना तोटा*
*मोठलास्ना पडा पाय, धाकलास्ले भेटे घाटा*

दिवाळी उत्सव

दिवाळीचा सणोत्सव हा खानदेशातला ५–६ दिवस चालणारा ( वसुबारस पासून ते भाऊबीजपर्यं ते) मोठा सणोत्सव असतो. हा सण सासुरवाशिणींचा अतिशय प्रिय सण असतो. या सणाच्या निमित्ताने माहेरचा सहवास तीला अधिक लाभतो. हा सण जवळ आला म्हणजे सासुरवाशीण बहिण आपल्याला घ्यायला येणाऱ्या भावाची आतुरतेने वाट पाहत असते तीला माहेरी जाण्याची फार हुरहुर लागलेली असते. म्हणून ती आपल्या भावाची दररोज वाट पाहत असते ती म्हणते–

*दसरापासीन दिवायी ईस रोज*
*मना बंधुनी वाट दखस मी रोज,*

बहिणीला घ्यायला आलेल्या भावाला परत पाठवू नका सासुबाई असे सांगतांना ती म्हणते–

*दिवायीनं मूय नका परतावा आत्याबाई*
*बहिनना बिगर भाऊ किलवाना जाई*

ही सासुरवाशीण बहिण दिवाळीला माहेरी आल्यावर तीला आई ,वडील, भाऊ, वहिणी असे सर्व गणगोत भेटते त्यामुळे घरात आनंदी वातावरण असते या आशयाच्या ओव्या पुढील प्रमाणे–

*माय दिवायी दसरा आते, दुखले ईसरा*
*आनन कराले सन नहीतवं दुसरा*

दिवाळीला शेतीच्या कामांची लगबग सुरु असते मात्र भावाला ओवाळायला दिवाळीसारखा दुसरा सण नसतो या आशयाच्या ओव्या पुढील प्रमाणे–

*दिवायी दसरा खेतीबाडीना पसारा*
*भाऊले ववायाले सन नहीसे दुसरा*

दिवाळी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी भाऊबीज असते बहिण भावाला ओवाळते व त्या बदल्यात मला भरजरी साडी चोळी घेऊन दे असे



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
Dec. 2018

हक्के ने सांगते अशा आशयाच्या ओव्या पुढीलप्रमाणे-

*भाऊबीजना रोज भाऊ मी बवावस तुले*
*नवी भरजरी साडी आणि चोयी शीव माले*

सण – उत्सवांविषयी माहिती व ओव्यांची प्राप्ती

१) श्रीमती मंदोदराबाई श्रीराम साळुंके. मु. पो. शेवाळी ता. साक्री जि. धुळे

संदर्भ सूची :

१) श्रीमती भागवत दुर्गा – लोकसाहित्याची रूप रेखा – वरदा बुक्स पुणे.
२) डॉ. पगार स. नि. – खानदेशातील ग्रामदैवते व लोकदैवते – का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे.
३) डॉ. बाबर सरोजिनी – मराठीतील स्त्रीधन – कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
४) डॉ. मांडे प्रभाकर – मौखिक वाङ्मयाची परंपरा स्वरूप आणि भवीतव्य – गोदसवरी प्रकाशन औरंगाबाद.

Self Attested



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal July-August-Sept. 2018 Vol. 5, Issue 3

# साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातील स्त्री-जीवन

**डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके**
मराठी विभाग प्रमुख
सी.गो.पाटील महाविद्यालय,साक्री. (धुळे)
मो- ९४२०३७५६९६

खानदेशात अहिराणी लोकगीतांची परंपरा अतीप्राचीन आहे. अहिराणी बोलीत लोकगितांचे दालन समृध्द आहे. मौखिक परंपरेने लोकजिवनात प्रचलित असलेल्या लोकगितातून लोकजीवनाचे दर्शन घडते. 'ओवीगीत' हा खानदेशातील स्त्रियांच्या अहिराणी लोकगितातील प्रभावी आणि भावसंपन्न असा प्रकार आहे. विविध प्रकारचा आशय या गितातून व्यक्त होत असतो. खरे तर या ओवी गीतांच्या निर्मितीत स्त्रियांचाच मोठा वाटाआहे. ते एक प्रकारचे स्त्रीधनच आहे आणि ते स्त्रीधन साची तालुक्यातील स्त्रीयांनी मौखिक परंपरेने अहिराणी बोलीत आजदेखील जतन केलेले आहे.

साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीतील ओवीगीतातून स्त्रीजीवनाच्या विविध छटांचे प्रतिबींब पडलेले आहे. आई-वडील, सासू-सासरे, पती-पन्ती, दिर-जेठ, नणंद-भावजय, जावा, मामा-मावशी, मुलगा-मुलगी, भाऊ-बहिण, भाचा, लेक-जावई, अशा विविध नात्यांना या ओवीगीतात विशिष्ट स्थान आहे. या नात्यांमागे दडलेल्या विशिष्ट भुमिका, कर्तव्य, पावित्र्य, त्यातील सुख-दुख, राग-लोभ, वात्सल्य भाव, आदरभाव, स्नेह आदि भावनांच्या ऋदयस्पर्शी, अविष्कार अहिराणी स्त्रीगीतातून झालेला आढळतो. स्त्री ज्या कुटुंबातून लहानीची मोठी होते, ज्या कुटुंबात राहते, नांदते त्या कुटुंबातील अनेक नातेसंबध त्या कुटुंबाशी जोडले जातात.. कौटुंबिक नात्यातील भावसंबधाचे अत्यंत हळूवारपणे चित्रण या ओव्यांमध्ये केलेले असते. म्हणून या नात्यातील जिव्हाळा , आणि ओलावा आजही टिकुण आहे. आंतरीच्या उमाळ्यातून या ओव्यांची निर्मिती झालेली असल्यामुळे त्या ओव्या भावस्पर्शी आहेत.

साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातील स्त्रीजीवन अत्यंत वास्तवदर्शी आहे. आईवडिलांचे स्थान ओवीगितांमध्ये अनन्य साधारण आहे. आईवडीलांविषयी कृतज्ञताभाव आणि प्रेमभाव व्यक्त करणाऱ्या ओव्या साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रीया अगदी सहज गातांना आढळतात. अहिराणी बोलीत बापासाठी 'आयबा' हा शब्द रुढ आहे. तो शब्दही या ओवींमध्ये आल्याचे आढळते. स्त्री ही लग्न होई पर्यंत आईवडीलांकडेच राहते. त्यावेळी आईवडीलांनी तिला दिलेले प्रेम, माया, स्नेह, वात्सल्य, तिच्यावर केलेले संस्कार या गोष्टी ती कदापी विसरू शकत नाही. म्हणून वडीलांचे राज किती चांगले असते हे सांगतांना ओवीगीतातील स्त्री म्हणते-

"राजमंदी राज ना लागे, आयबाना राजले
ऊगना सुरीनारायन, ऊन पडं चौरंग बाजले"

आपल्या वडिलांना ती समुद्राची उपमा देते. समुद्रासारख्या विशाल हृदयाचा बाप सर्व सृष्ट्रीमध्ये शोधून सापडणार नाही. म्हणजे बापाची सर दुसऱ्या कुणालाही येणार नाही हे सांगतांना ती म्हणते-

"समदीर समदीर, समदीर मना पीता
हात घाली जवू, समदीर भरेल से का रीता"
"समदीर समदीर, समदीर सारखा साठ नई
घाली सिरष्टी पायंदये, आयबा सारखं कोणी नई"

मात्र वडीलांकडची कितीही श्रीमंती असली तरी त्या श्रीमंतीवर लग्न झालेल्या मुलीचा तेवढा अधिकार नसतो. तिला तीच्या पन्तीने राज्य हेच 'रामराज्य' असते. त्यात तीला सर्व अधिकार प्राप्त झालेले असतात. त्यातच ती सुखी असते माझा संसार कसा सुखाचा आहे ते ती पुढील ओवीतून सांगते.-

"भरतारनं राज, कोरा रांजनंन पानी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal July-August-Sept. 2018 | Vol. 5, Issue 3

उपसू दोन्ही हाते, माले वरजेना कोनी"
"भरतारनं राज, घर दारमा मायेना
पितयी पलंगवर, मना हरींना पायना"

नवऱ्याच्या घरची परिस्थिती गरीबीची अंसेल तरी ती तेथे आनंदाने राहते. नवऱ्याला जन्मभर साथ देते, त्याच्या नावांच कुंकु लावते, नाकात नत आणि गळ्यात काळी पोत घालते. तरी चंद्रज्योती सारखी सुंदर दिसते ते तीचे वैभव ती पुढील प्रमाणे सांगते-

"नाकातनी नथ, गयामानी कायी पोत
बाहेर निंघनी नार, दुबयानी चंद्रज्योत"

नवऱ्याची परिस्थीती गरीबाची जरी असेल तरी आपलं मुल सोन्यापेक्षाही मुल्यवान आहे. कारण आपल्याकडे सोन कितीही असलं तरी ते दुसऱ्याचं धन असतं, आपलं मुल आपल्या वंशाचा दिवा असतो आपल्याला आयुष्यभर तोच कामास येणार असतो. म्हातारपणी तोच आपला आधार असतो. म्हणून सोन्यापेक्षाही तीला तीचं स्वतःच मुल गोड लागतं असे ती पुढील ओवीतून सांगते-

"शेरभर सोनं व नारी, तुनं से का मनं
कडे उचली लिवू, बाय दुबया भरतारनं"

मात्र हेच सोन्यासारखं मुल जेव्हा लग्न झाल्यावर पत्नीचे ऐकून जेव्हा आईला हिनकस वागणूक देतो तेव्हा ती मुलाला प्रश्न विचारते की,-

"माय माय करी, मावऱ्या माया किती
लेक तुले न्हानाना म्होटा कया, तवय तुन्ही आस्तुरी कोठे व्हती?"

जन्मदात्री आईला विसरून मानलेल्या आईला मान देणाऱ्या मुलास ती म्हणते-

"माय माय करी, मावऱ्या माया बारा
जीनी जलम दिया तीना उपकार खरा"

नऊ महिने पोटात वाढवले सहा महिने मांडीवर खेळवले याची आठवणही ती त्याला करून देतांना म्हणते-

"माले जनम दिधा माय मनी मंडोधर
नव महिना वझं वागं, सव महिना मांडीवर"

मुलाला प्रश्न विचारणारी व खऱ्या आईची महती सांगणारी आई देवाला म्हणते, हे देवा मला गरीब राहू दे मी गरीबीत माझा संसार चालवेल पण माझ्या पतीचे (राम) आयुष्य वाढू दे अशी विनंती करतांना ती म्हणते-

"अरे अरे देवा, माले दुबयं राहू दे
कपायना कुंकु मना, जलमे जावू दे"

शेजारीनबाई जेंव्हा तीला आई - वडीलांच्या गरीबीची हकीकत विचारते तेंव्हा ती तीला अतिशय छान उत्तर देते-

"शेजीबाई सोदे, दुबयापननी हाकीगत
माता तरी पीता, चुनगजी पाया मजबूत"
चुगनजी पाया दनदन, चुगनजी पाया दनदन
बंधू मना जायात कमावता, आते कसांन दुबयंपन"

मुलीचे लग्न झाल्यावर व्याही कसाका असेना आपल्या मुलीसाठी तो चांगलाच वाटतो याचे वर्णन ती पुढील ओवीतून करते-

"आबांनी कयरी, आंबाले घाले वारा
लेकी बाईना करता, सोयरा पाटील लागे प्यारा"

तसेच मुलीच्या वडीलांच्या धैर्याचे वर्णन करतांना ती म्हणते-

"लेकीका बापनी, धन-दगडनी छाती
तोडा कलीजाना घड, दिधा पराईना हाती"

आई वडीलांना मुलगा कायम स्वरूपी सांभाळ करतो व मुलगी लग्न झाल्यावर आई वडीलांच्या बंधनात न राहता त्यांना सोडून सासरला जाते तेव्हा ओवीतील स्त्री म्हणते-

"लेक लेकीना इंधने, लेक लेकीना इंधने
लेक दिये पानी, लेकी तोडस बंधनें"

सासरला गेलेली अज्ञान मुलगी सहा महिन्यात सासर कडच्या लोकांना पुर्ण जाणत नाही ती जेव्हा आई वडिलांना माहेरी भेटायला येते तेंव्हा आई म्हणते-

"सासरी गई लाडी मनी, लाडी सासर काय जानी
सव मयनानं मैना, सासर करी वनी"

सासरला कामधंद्यामुळे लेक थकुन गेलेली आहे आणि माहेरला आल्यावर तीने खुप झोप काढलेली आहे म्हणजे थकवा काढलेला आहे ते सांगतांना ती आई म्हणते-

"सासर वासीनले झोप लागी गई गहरी
कोंबडा बयरी यानी बांग दिधी दुह्यरी
उशाले उससी, पायातले पडं ऊन
अजान मैना मनी, काढे सासरनं शीन"

सासु आणि सासरे हे आईवडीलांसारखेच असतात मात्र अलिकडे त्यांना अत्यंत वाईट वागणूक दिली जाते अशी वागणूक देऊ नये ते सांगतांना ती म्हणते-

"सासु नी सासरा, देव्हारना देव
यासना [illegible]भाव"

सासू, सासरा, दीर, नणंद, यांच्या विषयीही ती म्हणते-

"सासू नी सासरा दौलतन्या भिती
देव माडीना कयस, ननीन धाकली पारबती"

मुलीचे लग्न कितीही चांगल्या श्रीमंत घरातील मुलाशी लाऊन दिले मात्र तीचे नशिबच खोटं असेल तर तीचे आईवडीलही काहीच करु शकत नाहीत याचे वर्णन करतांना ती म्हणते-

"दैव-दैव करी, दैव चंदननी खाप
खोटा नशिबले, काय करथी मायबाप"

आणि दैव (नशिब) जर चांगल असेल तर-

"दैव दैव कर, दैव निंघनं भागनं
तोडीला चंदन, लाकुड निंघनं सागनं "

स्त्रीचे सासर श्रीमंत असेल तर तीच्यातही हावरटपणा वाढून जातो पण कुठेही जा सर्वीकडे सारखेच असते वर्णन ती पुढीलप्रमाणे करते-

"नको करू नारी, नको करू मनं-मनं
जठे जाशी तठे, पयसाले पाने तीन"

आपल्याकडील धन-संपत्तीला कोणीच विचारत नाहीत पण जेवणाच्या वेळी कोणी दारी आले तर त्याला जेवन दिल्यास आपली किर्ती वाढते हे सांगतांना ती म्हणते-

"कोनी नाई सोदत, धन संपत्ती अती रेती
अम्रीत भोजन, दोन घासनी किर्ती"

ग्रामीण स्त्री देवभोळी व काळ्या आईची सेवा करणारी असल्यामुळे ती देवाला विनंती करते की, हे देवा मला पोटी पुत्र होऊ दे व माझ्या गोठ्यामध्ये गुरे-ढोरे वाढू दे हाच माझ्या संसाराचा साज आहे तो मला मिळू दे असे मांगणे मांगतांना ती म्हणते-

"दिसी रे देवाजी , संपत्तीना सरवा साज
आंगणले गाडा-घोडा, बसरीले बायराज"
"दिसी रे देवाजी, धनसंपत्ती थोडी-थोडी
आंगनले गाडा-घोडा, मना दारी नंदीसनी जोडी"

पोटचा मुलगाआई-वडीलांना म्हातारपणी सांभाळतो, दिर-जेठ कुणालाच होत नाहीत उलट ते आपल्या धन संपत्तीचे वाटेकरी असतांना म्हणून ती म्हणते-

"पोटे पुतरू महिमा फार, पोटे पुतरू महिमा फार
कोना नईथीन देरजेठ, धन संपत्तीना हिस्से दार"
"पोटे पुतरू महिमा मोठी, पोटे पुतरू महिमा मोठी
कोना नईथीन देरजेठ, धन-संपत्ती ल्हिदी वाटी"

मुलगी जेव्हा बालंतपणात माहेरी येते बाळंतन होत तेव्हा आईला धाक पडतो की, आता लेकीला साडीचोळी घ्यावी लागेल, बाळाला कपडे व दागीने घ्यावे लागतील, बाळंतपणाचा खर्च करावा लागेल, त्यावर ती म्हणते-

"लेक जाई लेकरवाई, मायबाईले पडा धाक
नका लेजा साडीचोईल, मना कडनं बाय झांक"

आई-वडील आहेत तोवर लेकीचे माहेरी येणं-जाणं असतं ते वारल्यावर भाऊ-भावजयचे राज येते त्यात बहिणीचे येणे-जाणे कमी होत जाते हे सांगतांना ती म्हणते-

"माय तवर माहेर, बाप तवढं येणं-जाणं
भाऊ-भावजाईन राज, मी नीठूर कयं मन. "
"माय तवर माहेर बानीनं, मायं तावर माहेर बानींन
सुन्या सिताबाई राज ऊनं, मथोरा रानीनं"

भाऊ जेंव्हा बहिनीला भेटायला तीच्या गावी जातो तेव्हा तीला फारआनंद होतो ती भावासाठी आंबरसाचे जेवण तयार करते त्याचे वर्णन अतिशय सुंदरपणेकेलेले आहे.-

"आंबानी कयरी, आंबाना देटले
दूरदेसना बंधू, बना बहिनीना भेटले"
"भाऊ कशा म्हणे, चाल जावू बहिनना देसले
सोजियान्या शिया, रांधू आंबाना रसले"

भावाला जेव्हा मुल होतं तेंव्हा बहिनीला फार आनंद होतो ती त्याला पहायला येतांना त्याच्यासाठी खेळणे, कपडे, दागदागीने घेऊन येते तीलाही भावाकडून साडी-चोळी मिळते याचे वर्णन करतांना ती म्हणते-

"भाऊले झाया लेक, पडं महित मयनाले
रंगीत पायना, साकयदंड जडीत घुंगरू खेयनाले"
"भाऊले झाया लेक, बहिनीले झाया भासा

सांगु सोनारले, धड घागरी दुयरा फासा"
"भाऊले झाला लेक, माले भासरू म्हणायेनं
चोई लुगडानं मनं, माहेर दुनायनं"

बहिणीच्या घरी मुलगी सुन म्हणून पाठवणे ही प्रथा आजही बहुवीध जातीत आहे. कारण जुने नाते नवे करण्यासाठी ती प्रथा असुन या संबधामुळे भावा-बहिनीत जवळीकता निर्माण होते. असा आशय पुढील ओवीतून निर्माण होतो-

"ननिनना मिसे, नंदुय कया मी याई
लेकी बाईनी करता, भासा कया मी जवाई"

भावालाच जर बहिनीने व्याही केले तर लग्नात आपले कोड कौतूक होईल, आपल्याला मान सन्मान मिळेल याचे वर्णन ती पुढील ओवींतून करते-

"गाव माहेरन्या, भारी गल्ल्या लामनन्या
भाऊ करू याही, पायदड्या रूमालन्या"

मात्र भावाला व्याही करू नकोस असे वडील म्हणतात. कारण आत्याच्या भावजया काही मान सन्मान करीत नाहीत याचे वर्णन अतिशय बोलके आहे-

"भाऊ करू याही, बाप म्हणस नको बाई
आतेन्या भवजाया, मानमहिमा जुग्या नई"

भाचा जावाई मात्र रंगाने काळा आहे म्हणून शेजारीण बाई तीला सांगते तुला जावाई काळा आहे त्यावर जावयाचे रंगरूप न पाहता त्याच्या गुणांची कदर करत ती शेजारणीला अत्यंत समर्पक उत्तर देते-

"माले शेजीबाई म्हणे, तुना काया से जवाई
काया कुरूसनले गई लाडी, हिरकनी देवाई"

आई आणि मामा जरी एकाच आईची लेकरं असतील. आई इतकंच महत्त्व मामालाही असते तरी आईची सर मामालायेत नाही असे सांगतांना ती म्हणते-

RESEARCH JOURNEY

"माय नी मामा बरोबरी, माय नी मामा बरोबरी
माय तुझी सर, नई व्हनार मामावरी, नई व्हनार मामावरी"

मात्र बऱ्याचदा पाटी मुलगा होत नाही म्हणून आई देवाला नवस करते, तो नवस फेडण्यासाठी मामा मावशी सुध्दा कसे पुढाकार घेतात ते ती पुढील प्रमाणे सांगते-

"नवसवा बाय, तुका नवस जागे जागे
मना दादाना तोयाभार, मामा जीजी फेडू लागे"

आयुष्याच्या शेवटी उतारवयात जीवपाला आजार लागला आणि माझ्या मनातील गोष्ट मनातच राहिली ती आई वडीलांनी सांगायची राहूनच गेली ते मरण पावलेत म्हणून ती गोष्ट मैत्रीणीला पुढील ओवीतून सांगते-

"जीवले भीरूड, कसे लागनं दिहिले
इरद फोडूनी, काय सांगावा सईले
"इरदेनी गोट मनी, इरदे ऱ्हाई गई
सरगे गयात माय-बाप, त्यासपन सांगानी याद नई"

आता माझा जीव थकून गेलेला आहे. थकलेल्या जीवाच्या वेदना आईला व बहिनीला जेवढ्या जाणवतात. तेवढ्या कोणालाच जाणवत नाहीत हे सांगतांना ती म्हणते-

"भंगना मना जीव, माले भंगले कोन म्हनी
माय बहिन बिगर, जीव येदना कोन जानी"

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)–6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) –0.676 (2013)
UGC Approved Journal July-August-Sept. 2018 Vol. 5, Issue 3

शेवटी ती म्हणते झाडाला जर उधईने खाऊन टाकले तर ते झाड तोडावेच लागते किंवा कोरडे पडून जाते तसे माझ्या ~~मा~~ शरीराला आजाराने खाऊन टाकले आहे म्हणून माझा जीव त्रासला आहे. देहरूपी नगर सोडून तो आता विधु व जायला पाहिजे म्हणजे मला आता मरण यायला पाहिजे याचे वर्णन ती पुढील ओव्यातून करते-

"झाडले भिरूड, झाड टाकवा तोडूनी
उबगीला जीव, जावा नगर सोडूनी"

स्त्री मेल्यावर तीला शेवटची 'बोळावन' भाऊच आणतो मात्र ती 'बोळावन' चांगली आण कारण ती बोलावण माझ्या ~~मा~~ गावातील आयाबाया पाहतील त्यांनी त्या बोळावनला नाव ठेवायला नको माझ्या माहेरचे नाव जायला नको असे ती भावाला पुढील ओवींतून सांगते-

"निदाननी येये, धाव घालीसी भाऊराया
सरती बोयावन जोथी, मन्या नगरीन्या बाया"

आई वारल्याचा निरोप गेल्यावर सर्व पै पाहूने आलेले आहेत मात्र लेकीला निरोप मिळूनही ती लवकर आलेली नाही इतकी ती तीच्या संसारात मग्न झालेली आहे हे सांगतांना ती म्हणते-

"लेक दिये पानी, सून गंगामधी ऊभी
आजु वनी नई, मनी लेकी संसारनी लोभी"

स्त्री मेल्यावर तिला तिरडीवर ठेवतात आणि तीचे दिर-जेठ आग्या खांद्या होतात तर तीच्या पती तिच्या तिरडीवर छत्री धरतो याचे अत्यंत मार्मिक वर्णन ती पुढील ओवीतून करते-

"निदाननी येये, किडीबाईले फुटा घाम
आग्या खांद्या देर-जेठ, वर छतरी धरे राम"

म्हणजे आयुष्यभर ज्याच्या सावलीत ती असते तीचा रामच म्हणजे पतीच तीला शेवटची सावली देण्याचही काम करतो.

अशा प्रकारे अहिराणी ओवीगीतातून स्त्रीमनाचे विविध भाव भावनांचे व जीवनाचे दर्शन घडते. ही ओवीगीते म्हणजे स्त्रीजीवनाचे एक अविभाज्य अंग होय. अंतरीच्या जिव्हाळ्यातून प्रकट झालेली ही गीते म्हणजे उत्कट भावनांचा सहज अविष्कार होय या गीतातून स्त्रीजीवनाचे विविध पैलू प्रकट झाले आहेत. ही स्त्रीगीते म्हणजे स्त्रीयांच्या अनुभवांचे बोल असल्यामुळे त्यात जीवंतपणा आलेला आहे. ह्या स्त्रीओवीगितांची निर्मिती त्यांच्या सुख-दुखःतील प्रेरणेतून निर्माण ~~झ~~ झालेली आहेत.

**ओव्यांची प्राप्ती :-**

१. श्रीमती मंदोरराबाई श्रीराम साळुंके, रा. शेवाळी, ता. साक्री, जि. धुळे

Self Attested

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
UGC Approved Journal | Impact Factor - (SJIF) - 6.261 | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

# साक्री तालुक्यात विविध सण - उत्सवावेळी सादर केले जाणारे अभिनयसंपन्न लोकनाटय : ललित

डॉ. प्रकाश श्रीराम सांळुके
सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री,
मो. ९४२०३७५६९६

**प्रस्तावना :-**

रंगमंचावर सादर होणाऱ्या नाटकापेक्षा 'लोकनाटय' हा प्रकार थोडा वेगळा आहे. लोकनाटय हे आज आपण ठिकठीकाणी साजरा होणाऱ्या लोकात्सवातून, दुरदर्शनाच्या पडण्यावरुन पाहत असतो परंतु महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील ग्रामीण भागात आजही गावजत्रा सण-उत्सव, विधीकर्माच्या प्रसंगी लोकनाटय सादर केले जात असते. त्याला खानदेशही अपवाद नाही. विविध सण- उत्सवात सादर केले जाणारे ललित, गावजनेच्या प्रसंगी सादर केला जाणारा तमाशा, मनोरंजन आणि उद्‌बोधन हयांच्या समेळातून समाजशिक्षणाचे लोकप्रिय असलेले साधन म्हणजे कीर्तन, कुळाचाराच्या प्रसंगी घातला जाणारा गोधंळ, दररोज वेगवेगळे रुप धारण करणारा बहुरुपी, पहाटे-पहाटे देवाचे नामस्मरण करीत. टाळ वाजवीत साऱ्या गावाला जागे करण्यासाठी अंगणात नाचत येणारा वासुदेव. असे अनेक लोककलाविष्कार खानदेशातील गावागावांमध्ये सादर केले जातात. हे लोककलाप्रकार लोकजीवनाच्या विधिकर्माच्या सण -उत्सवाचा भाग म्हणून सादर केले जातात.

**खानदेशातील ललित :-**

'ललित' हा अध्यात्मसंबंधी अभिनयसंपन्न असा खानदेशी लोककलाविष्कार आहे. त्यांचे स्वरुप मनोरंजनाचे असते. धर्म आणि समाजीवन यांचे कौशल्याने एकरुपीकरण ललितात साधलेले असते. कायिक आणि वाचिक असा दोन्ही प्रकारचा अभिनय ललितातली सोंगे (पात्र) करतात. ललितातील पात्रांना 'सोंगे' म्हणतात. अत्यंत उत्स्फूर्त आणि पात्रांच्या समयसूचकतेचा वारंवार प्रत्येय आणून देणारे चटपटीत संवाद हेच ललिताचे खरे बळ असते. ललिताचे स्वरुप सांगतांना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, "महाराष्ट्रात सर्वत्र देवाची उपासना होते. नवरात्रादी उपासनापर्वात तर ती विशेषत्त्वाने होते. काही ठिकाणी देवीचा वहनोत्सव वा छबिना निघतो उत्सवाच्या शेवटी उत्सवाच्या अधिष्ठान देवतेची मिरवणूक काढतात. देवाचा प्रसाद मागतात. देवाचा भक्तांनीच तयार केलेला नैवद्ये दाखवलेला प्रसाद भक्तांना वाटण्याचा समारंभ होतो त्यास ललित म्हणतात."[१] तर डॉ शरद व्यवहारे सांगतात की, "ललित हा नाटयप्रकार धर्मस्वरुपी मनोरंजानाचा असून धर्म आणि समाजजीवन यांची सांगड घालण्याचा त्यात प्रयत्न केलेला असतो. अभिनय आणि संवाद ही ललिताची प्राणतत्वे असून बहुजन समाजाचे मनोरंजनातून उद्‌बोधन हा ललिताचा उद्देश असतो."[२] अत्यंत लवचिक संहिता, विनोदाचा प्रचूर मात्रेतील वापर, कौशल्यपूर्ण संपादनी या साऱ्या घटकांनी ललिताचे लोकनाटय स्वरुपच सिध्द केले आहे.

महाराष्ट्राच्या अन्य प्रांताप्रमाणे खानदेशातही चातुर्मासातल्या श्रावण, भाद्रपद, आश्विन या महिण्यात विविध गावांना ललिताचे सादरीकरण केले जाते. ललिताचा मुख्यभाग म्हणजे त्यातील विविध पौराणिक कथानके होत. दशावतार रामायण, महाभारतातील विविध कथानके यात येतात. राम-रावण युध्द हा या कथानकामधील अत्यंत महत्वाचा भाग असतो. त्यांचा संवादही फार ओजस्वी असतो. ललितात केवळ अध्यात्माच्या प्रांतातील पात्रेच भेटतात असे नाही तर इतिहासातली पात्रेही सजिवंत होऊन भेटतात. कधी ती प्रत्यक्ष रंगभूमिवर अवतरतात तर कधी एखादया सोंगाच्या (पात्राच्या) बोलण्यात गाण्यात त्यांचा उल्लेख येतो.

खानदेशातील ललित हे प्रामुख्याने मराठी मिश्रीत हिंदी व अहिराणी बोलीत सादर केले जाते.खानदेशी ललिताच्या बाबतीत डॉ. सुधीर कोठावदे म्हणतात," खानदेशातील ललित हे प्रामुख्याने लोकोत्सवाशी वा गावात होणाऱ्या नामसप्ताहाशी निगडीत असते. तो एक ग्रामजनांचा आनंदोत्सव असतो"[३] याचा प्रत्येय ललिताचे सादरीकरण पाहिल्यावर माणसाला येतो.

**साक्री तालुक्यातील लळित :-**

साक्री तालुका हा देखील पश्चिम खानदेशचाच एक भाग आहे. म्हणून खानदेशातील इतर गावांप्रमाणेच साक्री तालुक्यातील शेवाळी, कासारे, पेरेजपूर, नाडसे आदि गावांमध्ये आजही लळिताचे सादरीकरण केले जाते. साक्रीपासून पुर्वेकडे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या शेवाळी गावात आजही बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे बाशीपोळ्याच्या रात्री आदिवासी भिल्ल वस्तीत लळिताचे सादरीकरण केले जाते. पुर्वी शाहूवस्तीत लळिताचे सादरीकरण केले जायचे. लळितात नाटकाप्रमाणे गाणीही असतात. त्या गाण्यांमधून काही सोंगांचा (पात्रांचा) परिचय करुन दिला जातो. शाहू वस्तीत लळितामध्ये सरस्वती (मोरनी) चे स्त्रीपात्र करणारे जुने कलावंत आमचे वडील कै. श्रीराम दिपचंद साळुंके व नाडसे येथील कलावंत श्री. साहेबराव अभिमन अहिरे यांनी लळिताविषयी पुढीप्रमाणे माहिती दिली.

नाटकात जसे अंक आणि प्रवेश असतात तशीच लळितात विविध सोंगे (पात्रे) येतात. ही सोंगे देवदेवतांप्रमाणेच लोकसंस्कृतीतील विविध घटकांचीही असतात. लळितातील रंगमंचावर सर्वप्रथम लळिताचा सूत्रधार येतो. (सर्व लळित त्याच्यावर अवलंबुन असते) त्यानंतर भालदार-चोपादार येतात. त्यांच्या पोषाख मराठा वीरासारखा असतो. डोक्यावर कंगणीदार पगडी, एकाच्या हातात भाला तर दुसऱ्याच्या हातात राजदंड असतो. ते ऐटीत पाऊले टाकीत लळिताच्या मचांवर येतात. सर्व प्रेक्षकांवर नजर टाकून रंगमंचाला वंदन करुन दवंडी दिल्याप्रमाणे अत्यंत तालबध्दपणे खड्या आवाजात "मेहरबान सलाम! गजानन महाराज की सुवारी आ रही है। निगाह रखोssss" असे म्हणतात आणि त्यांनतर गणपती व त्याच्या दोन्ही पत्नी नट आणि शारदा यांची सोंगे (पात्रे ) नाचत नाचत रंगमंचाकडे येत असतात. त्यांच्या पुढे विदूषकाचे (पांपुड्या) सोंग असते. त्याचा पोषाख साधाच असतो फक्त शर्टच्या मध्ये पोटात ऊशी (तक्क्या) घातलेली असते. त्यांचे पोट ढोलकीसारखे दिसते ते वाजवण्याचा अविर्भाव तो करतो आणि 'पांपुड्या पांम् माझ्याकडे पाहा' असे म्हणतो व गणपतीपुढे चित्रविचित्र हावभाव करुन नाचतो आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो व रंगमंचावर येतो भालदार चोपदार मंचावरुन निघून जातात व विदूषक स्वतःशी बडबड करत असतो. नंतर सूत्रधार व विदूषक यांचा पुढीलप्रमाणे संवाद सुरु होतो.

**सूत्रधार :-** आपण कोण ? आपले नाव काय?

**विदूषक :-** कोण मी ? असे प्रश्नार्थक विचारुन पुढील गाण्यातून आपला परिचय देतो.

"आमचे नाव विदूषक
आम्ही बोलु बेलाषक
आम्ही जातो पंढरपुरा
आमचे मडके जतन करा
ताक पाणी तुम्ही प्यावे
आम्हा लोणी जतन करावे
आमचे नाव विदूषक
आम्ही बोलू बेलाषक"

**सूत्रधार :-** आपण विदूषक आहात का?

**विदूषक :-** होय! मीच विदूषक.

**सूत्रधार :-** विदूषका, आम्ही लळित करण्यासाठी विघ्न निवारणार्थ कोणाचे स्मरण करावे?

**विदूषक :-** कोणाचे म्हणजे काय? आमचे करा. (प्रेक्षकांमध्ये प्रचंड हशा)

वरील संवाद चालू असतांना गणपती, नट व सरस्वती तीघे रंगमचावर येतात. सूत्रधार गणपतीचे वंदन करतो. (विदूषकही सुत्रधाराची नक्कल करतो) व म्हणतो", हे गणराज, मी लळिताचा आरंभ केला आहे त्यासाठी आपला आशीर्वाद पाहिजे. त्यासाठी तो पुढील ओवी म्हणतो-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
UGC Approved Journal | Impact Factor - (SJIF) - 6.261 | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

"गणपती गजानना देवा कृपा करा गणराजा
आशा जरीचे पदकमलाभी धाव रे धाव आता"

त्यावर गणपती त्याला "वच्छा, बालका, सूत्रधारा तुझे कल्याण असो." असा आशीर्वाद देतो. आणि गणपती सोबत आलेल्या नट व शारदा पुढीलप्रमाणे गाणे म्हणतात.-

"घागर घेऊनी पाण्याशी जाता-२
झप झप झप झप जाऊया चला, बाई जाऊया चला
चालतांना मौज वाटे भारी आम्हाला, बाई भारी आम्हाला
कपडे घेऊनी धुन्याशी जाता-२
झप झप झप झप जाऊया चला, बाई जाऊया चला
चालतांना मौज वाटे भारी आम्हाला, बाई भारी आम्हाला"

वरील प्रमाणे गाणे म्हटल्यावर ते निघून जातात. सुत्रधार व विदूषक यांच्यात संवाद सुरु होतो. विदूषक गणपतीची नक्कल करतो व सुत्रधाराला विचारतो, 'काहो महाराज सूत्रधारा, ते मोठ्या पोटाचे आणि लांब सोंडेचे उंदरावर बसून कोण आले होते?'

**सूत्रधार :-** अरे, ते विघ्नहर्ता गजानन होते.

**विदूषक :-** ओ$_{sss}$ ते गजानन का? मग मी त्यांचा भाऊ भजानन.

**सूत्रधार :-** अरे, तुझे नाव भजानन कशावरुन ठेवले?

**विदूषक: -** अहो, माझ्या जन्माच्या वेळेस माझ्या आईने टोपलंभर भज्या काढल्या आणि त्या मी सर्व खाऊन टाकल्या म्हणून माझे नाव भजानन ( प्रेक्षकांमध्ये प्रचंड हशा)

सूत्रधार व विदूषक यांचा वरीलप्रमाणे संवाद चालू असतांना भालदार चोपदार येतात व दंवडीच्या सूरात मेहरबान सलाम! सरस्वती माता आ रही है| हुश्शार रहो$_{sss}$ असे म्हणतात आणि सरस्वती मातेचे सोंग मोरावर बसून नाचत नाचत रंगमंचावर प्रवेश करते. सूत्रधार तीला वंदन करतो व म्हणतो "हे सरस्वती माते, मी लळिताला आरंभ केला आहे त्यासाठी आपण मला आशीर्वाद द्यावा" त्यावर सरस्वती त्याला 'वच्छा, बालका, सूत्रधारा तुझे कल्याण असो' मी माझ्या पित्याच्या सभेत बसली असतांना तुझी दीनवाणी करुना ऐकुन मी या रंगभूमिवर अवरतले आहे. बालका, कोणते संकट तुझ्यावर पडले आहे ते मला कथन कर. मी त्यातून तूला मार्ग दाखवीन वच्छा, मी माझ्या वराचा महिमा सांगते ते श्रवण कर 'जे मुके असतील ते बृहस्पतीवर भाषण करतील आणि जे पांगळे असतील ते महान पर्वत ओलांडतील' असा आशीर्वाद देवून रंगमचावरुन निघून जाते. नंतर विदूषक रंगमंचावर येतो आणि 'पांपुड्या पांम् माझ्याकडे पहा' असे म्हणून सरस्वती मातेची नक्कल करतो आणि सूत्रधार व त्याच्यात पुढीलप्रमाणे संवाद सुरु होतो-

**विदूषक :-** काहो सूत्रधारा, ती मोरावर बसून आलेली लांब चोचेची, मोठ्या पिसाऱ्याची ती कोण होती?

**सूत्रधार :-** अरे, ती माता सरस्वती होती.

**विदूषक :-** ओ$_{sss}$हो$_{sss}$ ती नदीकाठी चरत होती (लोंकामध्ये प्रचंड हशा)

वरील संवाद चालू असतांनाच भालदार चोपदार येऊन दंवडी दिल्याप्रमाणे म्हणतात मेहरबान सलाम! राजा दशरथ, श्री. प्रभुरामचंद्र व लक्ष्मण यांची सुवारी आ रही है | निगाहो रखो$_{sss}$ त्यांच्या मागे राजा दशरथ, राम व लक्ष्मण येतात व रंगमंचावर विराजमान होतात तितक्यात विश्वामित्र येतो आणि तिथून रामायणाचे कथानक सुरु होते. रामायणातील एक-एक पात्र येत राहते तसे लळित पुढे-पुढे सरकत जाते आणि प्रेक्षक लळिताच्या कथानकाशी एकरुप होत जातात. पहाटे-पहाटे पर्यंत लळित सुरु राहते. मध्ये मध्ये विदूषक मंचावर येतच राहतो आणि इतर पात्रांची नक्कल करुन प्रेक्षकांचे मनोरंजन करीत असतो. अशा प्रकारे रात्रभर लळिताचे सादरीकरण सुरू राहते.

सारांश :-

ललित हे लोकधर्मी अध्यात्मनाट्य असून त्याला प्राचीन परंपरा आहे. ललिताचे स्वरुप मनोरंजनाचे असून धर्म व समाजजीवन यांचे एकरुपीकरण त्यात साधलेले असते. कायिक आणि वाचिक असा दोन्ही प्रकाराचा अभिनय त्यातली सोंगे करतात. ललितात देव-देवतांचे मुखवटे घालून सोंगे नाचवली जातात. गणपतीच्या सोंगांने ललिताचा प्रांरभ होतो. ललितात भालदार, चोपदार, सूत्रधार, विदूषक आणि विविध देव-देवता अशी पात्रे असतात. सूत्रधार आणि विदूषक हे अधून मधून विनोद निर्मिती करतात. त्यांचे संवाद अत्यंत चटपटीत व उत्स्फूर्त असून पात्रांच्या समयसूचकतेचा प्रत्यय आणून देतात. साक्री तालुक्यात सादर केली जाणारी ललिते चातुर्मासातल्या महिण्यात सादर केली जातात. त्यात पौरानिक कथानके, दशावतार, रामायण, महाभारतातील अध्यात्माबरोबरच इतिहासातील पात्रेही अवतरतात. साक्री तालुक्यातील ललितात मराठी मिश्रीत हिंन्दी व अहिराणी अशा भाषांचा वापर केला जातो. ललितात लोकप्रतिभेचा उन्मुक्त आविष्कार व लोकरंजनातून उदबोधन केलेले असल्यामुळे ग्रामीण माणसात 'ललित' हा लोकनाट्य प्रकार आजही आवडीचा आहे.

संदर्भ सूची :-

१. डॉ. प्रभाकर मांडे :- लोकरंगभूमी -गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, वर्ष १९९४, पृ. ११३.
२. डॉ. शरद व्यवहारे :- लोकवाङःमय रुप स्वरुप- साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, वर्ष १९९९, पृ. १७१.
३. डॉ. सुधीर कोठावदे :- अहिराणी बोली सहित्य आणि संस्कृती आशापुरी प्रकाशन साक्री, वर्ष २००४, पृ. ६४.

**ललित विषयी माहिती देणारे ललित कलावंत :**

१. कै. श्रीराम दिपचंद साळुंके. ललित व नाट्य कलावंत, रा. शेवाळी, ता. साक्री, जि. धुळे
२. श्री. साहेबराव अभिमन अहिरे. ललित व नाट्य कलावंत, रा. नाडसे, ता. साक्री, जि. धुळे.

Self Attested

**'RESEARCH JOURNEY'** *International E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),**
**Vol. 7, Issue 1**
**Peer Reviewed Referred & Indexed Journal**

**E-ISSN : 2348-7143**
**Jan. Feb. March. 2020**

# साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ओवीतून प्रतिबिंबीत झालेले 'सप्तश्रृंगी' देवीचे चित्रण

**प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके**
सी.गो.पाटील महाविद्यालय
साक्री जि.धुळे.
मो.नं.९४२०३७५६९६

**प्रास्ताविक :-**

नाशिक जिल्हयातील नांदुरी गडावरची सप्तश्रृंगी देवी ही खानदेशवासीयांचीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या लोकांचे आराद्य दैवत आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे शक्तीपीठ म्हणजे सप्तश्रृंगी देवी होय. नांदुरी गडावर मार्कंडेय ऋषीने तिची स्थापना केल्याचे अख्यायिकेत सांगतात. गडावर सात शिखरे आहेत त्यावर सात देवतांचे वास्तव्य आहे. त्या सात शिखरांवरुनच या देवीला सप्तश्रृंगी माता असे नाव पडलेले आहे. अशी आख्यायिका सांगितली जाते.

गडाच्या परिसरात महिषासूर नावाचा एक राक्षक राहात होता तो परिसरातील लोकांना खूप छळतू होता देवीने त्याचा वध केला. म्हणून या देवीला 'महिषासूरमर्दिनी' असेही म्हणतात. अशीही आख्यायिका सांगितली जाते. चैत्र महिन्यात नांदुरी गडावर देवीची मोठी यात्रा भरते. महाराष्ट्रातून लाखो भावीक या यात्रेला येतात ही देवी आपल्या भक्तांची संकटातून सुटका करते म्हणून बहुतांश भक्त तीला नवस बोलतात. तो नवस फेडण्यासाठी काही भक्त अनवाणी पायी चालत गडावर येतात तर काही भक्त गडाबडा लोळून मातेच्या गडापर्यंत येतात कारण नवसाला पावणारी ही माता आहे अशी लोकश्रध्दा आहे.

सप्तश्रृंगी मातेविषयी खानदेशातल्या धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रीयांकडे अहिराणी बोलीतील ओवीरुपी गीते आजही ऐकायला मिळतात. या मातेचे वर्णन, तिने केलेला पराक्रम या ओव्यांतून सांगीतलेला आहे. या देवीला कोणी सप्तश्रृंगी माता, कोणी सत्तरशिंगी माता तर कोणी सत्तरसींगी आंबामाय, आंबाबाई असेही म्हणतात. या मातेचे सासर कोकणातले तर माहेर खानदेशातले आहे म्हणून खानदेशवरतीची विशेष कृपादृष्टी आहे. लक्ष आहे म्हणून ती खानदेशाकडे पाहत असल्यामुळे तिची मान वाकडी झालेली आहे असेही म्हटले जाते अशा आशयाच्या अहिराणी ओव्या पुढीलप्रमाणे-

" सप्तरसिंगी आंबामाय वाकडी तुनी मान
खानदेसन माहेर तथं लागनं तुनं ध्यान"

सप्तश्रृंगी देवीचा भाऊ परशुरामला कडकडून भूक लागली म्हणून तो तिच्याकडे लाडू खायला मागतो तेंव्हा तीने त्याला खायचा लाडू देण्याऐवजी त्याला संतापाने पाठीवर मारले त्यामुळे तो रागाच्या भरात तिच्या पाठीमागे कसा जाऊन बसला याचे वर्णन ती स्त्री पुढील ओव्यांतून करते-

" सप्तरसिंगी आंबामाय तुना परसराम लाडूमांगे
तिनी संतापे हानी थाप जाई बठना पाटमांगे"

सप्तश्रृंगी माता पैठणी साडीचोळीने कशी रुपवान दिसते. ती साडीचोळी तीला कशी शोभून दिसते याचे वर्णन ती अशिक्षीत स्त्री पुढील ओव्यांतून करते-

" सप्तरसिंगी आंबामाय गडवरली पिवयी
कसी साजस तुले आठराभुजनी काचोयी"

E-ISSN : 2348-7143
Jan. Feb. March. 2020

मातेचा निवास ज्या सप्तश्रृंगी गडावर आहे तो गड पायी चढायला फारच अवघड आहे. भाऊ बहिण मातेच्या दर्शनाला गडावर जात आहेत मात्र तो गड चढायला अवघड असल्यामुळे भाऊ आपल्या बहिणीला मातेचा दुरुनच पाया पडायला सांगतो अशा आशयाच्या ओव्या ती स्त्री पुढीलप्रमाणे गाते-

" सप्तश्रृंगी गड चढाले अवघड
बंधवा कशा म्हणे बईन दूरथीन पाया पड"

चढायला अवघड असलेल्या या गडावरच मातेने परीसरातील लोकांचा छळ करणाऱ्या महिषासूर नावाच्या राक्षसाचा वध केल्याचे ही स्त्री पुढील ओव्यांतून सांगते-

" सप्तरसिंग्या गड चढता चढायेना
आंबामायना पायखाल ऊभा दैत गाडायना"

जन्मापासूनच पराक्रमी असलेल्या हया मातेने त्या राक्षसाला जेव्हा संतापात लाथ मारली तेव्हा त्या गडाला देखील कसे खिंडार पडले हे ही ती स्त्री पुढील ओव्यांतून सांगते-

" सप्तरसिंगी आंबामाय तू ते जलमनी अभंड
कशी मारी तू लात पाडी डोंगरले खींड"

सप्तश्रृंगी गड चढायला अवघड आहे कारण त्या गडाला सर्व बाजूने वेढे आहेत तरी या वेढयांमधून जावून तू कसा पराक्रम केला याचे वर्णन पुढील ओव्यांतून ती स्त्री करते-

" सप्तरसिंगी आंबामाय तुना गडले सेतस येढा
मावना कया भाऊ खेई वनी चितखडा"

नवसाला पावणारी ही माता असल्यामुळे मातेचा भक्त मानलेला नवस फेडण्यासाठी बैलगाडी जुंपून गडावर गेल्याचे पुढील ओव्यांतून ती स्त्री सांगते-

" नवस मी बोलू मनी सप्तरसिंगी लाडील
सरपना चाबूक नंदी जुंपले गाडील"

मातेचे काही भावीक मातेला केलेल्या नवसामुळे बाळ झाल्यावर मातेपुढे त्या बाळाचे जावळ काढायला जातात त्याचे वर्णन पुढील ओव्यांतून ती स्त्री करते-

"सप्तरसिंगी माय तुनी शेंदुरनी खोली
मना बंधवाले झाया लेक तठे जावूयनी बोली"

सप्तश्रृंगी गडावर मातेच्या यात्रेच्या वेळी पहाटेच्या वेळी मातेचा ध्वज कोण लावून जातो ते कोणालाच कळत नाही. बऱ्याच लोकांना त्याची उत्सुकता असते पण ध्वज लावणारा दिसत नाही याचे वर्णनही ती स्त्री पुढीलप्रमाणे करते-

" सप्तरसिंगी आंबामाय तुना गड चढू घाईघाई
समजेना धज चावदसना गडवर कोन जास लाई"

आपल्या भक्तांच्या नवसाला पावणारी ही सप्तश्रृंगी माता राजालाही पावलेली आहे आणि म्हणून गडावर मोत्याचा ध्वज त्या राजाने लावला असल्याचे ती स्त्री पुढील ओव्यांतून सांगते-

"सप्तरसिंगी आंबामाय पावनी कोणा राजाला
हाती तिरसूळ ध्वज मोत्याचा लावला"

ज्या राजाला ही माता पावली त्या राजाने मातेला सोन्याने मढवलेले असल्याची ख्यानी सर्वदूर पोहचली असल्याचेही ती स्त्री पुढील ओव्यांतून सांगते-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 1
Peer Reviewed Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. Feb. March. 2020

" सप्तरसिंगी आंबामाय तुनी दूरवर आवाई
कोन्या राजाले पावली त्यांनी बांधी सोनानी देवई"

अशी ही सर्वदूर ख्याती असलेली सप्तश्रृंगी माता खानदेशातल्याच नव्हे तर सर्व महाराष्ट्रातल्या लोकांचे आराद्य दैवत बनलेली आहे.

**सारांश :-**

खानदेशवासीयांचीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या लोकांचे आराद्य दैवत असलेली सप्तश्रृंगी देवी ही महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे शक्तीपीठ असून ही देवी नवसाला पावणारी, भक्तांना संकटमुक्त करणारी असल्यामुळे विशेषतः खानदेशची माहेरवाशीन असल्यामुळे खानदेशातील लोकांची तिच्यावर अगाध श्रध्दा आहे. त्या श्रध्देतून आणि देवभोळया लोकसंस्कृतीतून या मातेच्या पराक्रमाचे, नवसाचे, तीच्या गडाचे गुणगाण आजही साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रींयाच्या ओठांतून सहजपणे बाहेर पडतांना दिसते.

**ओव्यांची प्राप्ती :-**

१) श्रीमती मंदोदराबाई श्रीराम साळुंके. मु.पो. शेवाळी, ता.साक्री ,जि.धुळे

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २६. संत साहित्यातील संत कवयित्री: विशेष संदर्भ संत कान्होपात्रा

**प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके**
सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री - जि. धुळे.

### प्रस्तावना

महाराष्ट्र भूमी ही संतांची पावन भूमी आहे. येथे वैराग्याची परंपरा मांदलेली आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वाङ्मयीन परंपरेत संतांचे कार्य आणि महत्व अनन्यसाधारण आहे. सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्याचे संतच खरे शिल्पकार होत. तेराव्या शतकामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांनी भागवत धर्माचा म्हणजेच वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. संत नामदेवांनी आपल्या भावोएकटतेने, श्रद्धाबळाने आणि समर्पणशील वृत्तीने भागवत धर्माच्या पताकाखाली सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्रित आणले जातीभेदापलीकडे जाऊन समतावादी विचाराने एकत्रित आलेल्या वारकऱ्यांमध्ये भक्तीमधून स्नेहभाव रूजवला. आणि पंढरीच्या पांडुरंगाच्या प्रांगणात, चंद्रभागेच्या वाळवंटात अठरापगड जातीच्या वारकऱ्यांची मांदियाळी जमवून, वर्णाभिमान विसरून अध्यात्मिक लोकशाहीची प्रतिष्ठापना केली. रूढीग्रस्त अज्ञ जनांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. संत ज्ञानेश्वरांनी त्यांना खऱ्या खऱ्या धर्माचा अर्थ सांगितला. संपुर्ण समाज भक्तीच्या एका सूत्रात बांधला. भक्तीच्या क्षेत्रात कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही, लहान-थोर, स्त्री-पुरूष, उच्च-निच्च सर्वांनाच भक्तीचा अधिकार असून भक्तीच्या बळावर इथे पापी माणसाचाही उद्धार होत असल्याचे सांगितले. देव भावाचा भूकेला असतो. त्याला जाती कुळाशी काही देघेणे नसते ही विचारसरणी मांडून अध्यात्मिक लोकशाहीचे, समतेचे बंधत्वाचे मर्म सांगितले हे सर्व संत ग्रामसंस्थेतील अलुतेदार-बलुतेदार होते. फार काही शिकलेले नव्हते. त्यांनी जमेल तसे आपले भाव देवापूढे निरूपण केले. प्रपंचात आलेले भलेबुरे अनुभव, व्यक्तिगत सुखदु:खे, समाजात होणारी उपेक्षा मुक्तीची आस, समतेचा ध्यास याचेच प्रतिबिंब त्यांच्या निवेदनात उमटलेले आहे. त्यांची भाषा साधी-सोपी-सरळ, रसाळ, अनलंकृत आणि हृदयाचा ठाव घेणारी आहे. उच्च जातीच्या संतांना जातीचा अभिमान नाही आणि हीन जातीच्या संतांनी जातीबद्दल कमीपणाही अनुभवला नाही. या भक्तीमार्गात सर्व स्तरातील आणि व्यवसायातील स्त्री-पुरूष एकत्र आलेत. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत चोखामेळ्यापर्यंत आठरा पगड जातीच्या या संत पुरूषांसोबत संत मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, भागू, कान्होपात्रा यासारख्या स्त्रीसंतांचाही समावेश आहे. या सर्व संतांनी भक्तीमार्गमध्ये आपापले योगदान दिलेले आहे. संत कान्होपात्रेचे जीवन भाग या सर्व संत कवी-कवयित्रीपेक्षा मला वेगळे जाणवल्यामुळे सदर निबंधातून त्यांचे स्मरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### संत कान्होपात्रा यांचा जीवन परिचय

पंढरपूरपासून २४ की.मी. अंतरावर असलेल्या मंगळवेढा या गावी कान्होपात्रेचा जन्म शामा नामक गणिकेच्या पोटी इ.स. १४६८ मध्ये झाल्याचे मानले जाते. अवघ्या तीस वर्षांचे आयुष्य तीला लाभले. गणिकेच्या पोटी जन्मल्याने तिला पित्याचे छत्र लाभले नाही. नाचगाण्याची कला कुळातच असलेली कान्होपात्रा तारूण्यात अधिकच सुंदर दिसू लागली होती

तीच्या रूपाची व नृत्यगायन कलेची कीर्ती चोहीकडे पसरली होती. आपल्या मुलीने आपल्यासारखेच गणिक व्हावे असे शामाला वाटत होते. तिच्या जीवाने आपलं श्रीमंती उपभोगू असा शामाचा मनोदय होता आणि तो मनोदय शामाने कान्होपात्रेस बोलून दाखवला मात्र तीला मान्य नव्हते. तीला आईप्रमाणे देहविकय करायचा नव्हता. कारण ती लहानपणापासूनच ती श्रीकृष्णाची भक्त होती. 'कै मी उद्धार पावेन । कै कृपा करील नारायण ।' अशी भक्तीची आर्तता तिच्या वृत्तीत होती. तीला अध्यात्मात रूजायचे होते. मात्र तीला आपण गणिकेच्या कुळात म्हणजे हीन कुळात जन्मल्यामुळे परमेश्वर आपली भक्ती मान्य करील काय? परमेश्वर आपणास प्राप्त होईल काय? आपला उद्धार करील काय? असे अनेक प्रश्न तीला सतावत होते तरीही ती कृष्धभक्तीत आपले जीवन व्यतित करते.

कृष्णभक्तीत तल्लीन असल्यामुळे तीला पंढरीच्या वारकऱ्यांची भजने ऐकण्याचा छंद लागला. त्यांच्याबरोबर तीही पंढरपूरास गेली. पांडुरंगाचे सावळे सगुण रूप पाहून तीला त्याचा लोभ जडला. ती पांडुरंगचे गुणगाण गाऊ लागली.

कान्होपात्रेच्या सौंदर्याची कीर्ती बिदरच्या राजाच्या कानावर जाते. राजा तीला आणण्यासाठी सैनिक पाठवतो. ते सैनिक तिच्यापुढे बादशहाच्या तारूण्याचे व वैभवाचे वर्णन करतात आणि आम्ही तुला राजाकडे घेऊन जाण्यासाठी आलो असल्याचे सांगतात मात्र तीला ते काहीही नको होते. तीला आपले चारित्र्य व शील जपायचे होते. पांडुरंगाच आपल्याला यातून मार्ग दाखवेल असा विश्वास तीला असलयामुळे ती मनोमनी विठ्ठलाच्या धावा करते स्वतःच्या आईपेक्षाही तीला पंढरीची विठाई, कृष्णाई; कान्हाई विश्वासाची वाटल असल्यामुळे ती त्या सैनिकांना सांगते की 'बिदरला येण्यापूर्वी मला पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे आहे. तुम्ही इथे बसा मी मंदिरात जाऊन येते. पांडुरंगाचा निरोप घेऊन येते.' आणि ती मंदिरात जाते दुवासन्मुख बसून ती पांडुरंगाला विनवनी करते त्याला त्याच्या ब्रिदाची आठवण करून देते अखेर तिची निस्सिम भक्ती पाहून पांडुरंग त्याच्या ब्रिदास जागतो आणि कान्होपात्रेचे संरसण करण्यासाठी तिचे प्राण .स्वरूपात विलीन करून घेतो. तिची आत्मज्योत देवाच्या ज्योतीत एकरूप होते व तीचा अचेतन देह देवाच्या पायाशी पडतो.

अशा प्रकारे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात आपले जीवन व्यतित करणारी, विठ्ठलाची अनन्यभावे भक्ती करणारी, यातीहीन अशा गणिका कुळात जन्मलेली कान्होपात्रा आपल्या भक्तीच्या बळावर संत पदास पोहचली.

**संत कान्होपात्रेची अभंग रचना**

संत कानेपात्रेचे २३ अभंग उपलब्ध असून ती विठ्ठल दर्शनाचा आनंद, विठ्ठल ब्रिदाची आठवण, यातिहीनतेची भावना, विठ्ठलाची आर्त याचना अशा अभंगरचनेबरोबरच उपदेशपर अभंगाची रचनाही तीने केल्याचे दिसून येते.

**विठ्ठल दर्शनाचा आनंद**

पंढरपूरच्या विठाईच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसोबत कान्होपात्राही विठ्ठल दर्शनास येते. मात्र माझ्यासारख्या यातिहीन भक्ताचा पांडुरंग स्वीकार करील काय? अशी प्रश्नवजा शंका तीच्या मनात येते मात्र विठ्ठलाचे दर्शन घेताच तीची शंका दूर होते व विठ्ठल दर्शनाने मनस्वी आनंदाची प्राप्ती येते –

"जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आले ।
म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ॥"

जन्मोजन्मी केलेल्या सत्कृत्यांचे फळ आज मिळाले. विठ्ठल चरणाचे दर्शन घेण्याची आस आज पूर्ण झाली असल्याचे ती आपल्या अभंगातील सदर ओव्यांतून सांगते.

विठ्ठल ब्रिदाची आठवण :- संत कान्होपात्रा आपल्या पुढील अभंगातून विठ्ठलास त्याच्या ब्रिदाची आठवण करून देते-

"पतित पावन म्हणविसी आधी ।
तरी कां उपाधी भक्तामागे ॥१॥
तुझें म्हणवितां दुजे अंगसंग ।
उणेपणा सांग कोणाकडे ॥२॥
सिंहाचे भातुकें जंबुके पैं नेतां ।
थोरोचिया माथां लाज वाटे ॥३॥
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणें ।
करावा जतन ब्रीदासाठी ॥४॥

वरील अभंगातून कान्होपात्रा विठ्ठलास त्याच्या ब्रीदाची आठवण करून देतांना म्हणजे हे विठ्ठला, तुझ्या भक्तांनी तुला 'पतितपावन' ही उपाधी दिलेली आहे. तू स्वत:लाही पतितपावन म्हणवतोस, भक्तांना आपले मानतोस मग मलाच का मदत करत नाहीस ? मग उणेपणा तुझ्याचकडे येणार. सिंहाचे खाद्य जर जंबुळ घेऊन गेला तर तो सिंहाचा अपमाण नाही का? तसेच मला बिदरच्या बादशहाने नेले तर तो तुझा अपमान होणार नाही का? म्हणून तू तूझे ब्रीद खरे करून दाखव. भक्ताचे रक्षा करून तुझे ब्रीद जतन कर.

यातीहीनतेची भावना :- संत कान्होपात्रा गणिकाकुळात म्हणजे हीन कुळात जन्मल्यामुळे आपली भक्ती पांडुरंग स्वीकारील काय? अशी चिंता तीला लागून राहते आणि म्हणूनच यातिहीनतेची भावना ती पुढी अभंगातून व्यक्त करते –

"दीन पतित अन्यायी । शरण आले विठाबाई ॥१॥
मी तो आहे यातीहीन । नकळे काही आचरण ॥२॥
मज अधिकार नाही । भेटी देई विठाबाई ॥३॥
ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ॥४॥

सदर अभंगातून कान्होपात्रा विठ्ठलास म्हणते की, यातीहीन असल्याने भक्ती मार्गावर कसे आचरण करावे हे मला कसे कळेल ? मला तो अधिकार नाही. विठाबाई तू मला भेट व माझी भक्ती स्वीकार. माझी करूना येऊ दे. मी तुझी दासी तुला शरण आलेली आहे अशी यातीहीनतेची भावना सदर अभंगातून कान्होपात्रा व्यक्त करते.

विठ्ठलाची आर्त याचना :- स्वत:च्या जन्मदायीकडूनच गणिकेचा वंशपरंपरागत व्यवसाय करण्याचा आग्रह कान्होपात्रेला होतो. मात्र तीला हे नको असते म्हणून ती विठूमाऊलीला पुढील अभंगातून याचना करतांना दिसते –

"जीवींचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे कांही ॥१॥

आला अपवाद याती संबंध लौकीक पाही ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे काही ॥२॥
दीनोद्धार ऐसे वेद शास्त्रें गर्जती पाही ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे काही ॥३॥
शरण कान्होपात्रा तुजला वेळोवेळां पाही ।
सांवळे डोळसे करूणा येऊंदे काही ॥५॥

संत कान्होपात्रा विठूमाऊलीत कृष्णाचे रूप पाहते व विनंती करते की, तू माझ्या जीवाची जीवलग आहे. तुला माझी कीव येऊ दे. मी हीन कुहातील असल्यामुळे भक्तीचा आधिकार नसलेली आहे. परमेश्वराला प्राप्त करून घेण्याचा अधिकार नसतांनाही मी तुझी आळवणी करते आहे.

वेद-शास्त्र पुराणात दीनोद्धाराला महत्त्व दिले असल्याचे लक्षात घेऊण तू माझी भक्ती स्वीकारली. माझा उद्धार करावा. मी तूला सदैव शरण आहे. आर्त याचना सदर अभंगातून कान्होपात्रा विठ्ठलाला करते.

उपदेशपरता :- विठ्ठलाला विनवणी करणाऱ्या, शरण जाणाऱ्या संत कान्होपात्रेने विणय वासनेच्या आहारी माणसाने जावू नये असा उपदेशही केलेला आहे. त्याचा प्रत्यय तीच्या पुढील अभंगातून येणे ----

"विणयाचे संगती । नाश पावले विश्चिती ॥१॥
भगें पडली इंद्राला । भस्मासूर भस्म झाला ॥२॥
चंद्रा लांगला कतंक । गुरूपलीसी रतला देख ॥३॥
रवण मुकला प्राणासी । कान्होपात्रा म्हणे दासी ॥४॥

सदर अभंगातून संत कान्होपात्रा उपदेश करते की, ज्या दुराचाऱ्यांची विषय-वासनेचा नाद घेतला त्या सर्वांचा नाश झाला. इंद्र, चंद्र रावण यांनी परस्त्रीची विटंबना केली. वासनेच्या आहारी गेले त्यामुळे ते नष्ट झाले म्हणून माणसाने विणय-वासनेच्या आहारी जावू नये.

वरील प्रकारे संत कान्होपात्रेच्या अभंगातून वेगवेगळे विषय हाताळल्याचे जाणवते.

**संत कान्होपात्रेच्या अभंगांची वैशिष्ट्ये**

१. संत कान्होपात्रेचे अभंग भक्तीने भरलेले, भक्तीरसात न्हालेले, अर्जनी असे आहेत.
२. संत कान्होपात्रेच्या अभंगात प्रेमभाव, करूणा, श्रद्धा, दास्यभाव, साफल्यभाव व्यक्त होतो.
३. विठ्ठलाची आर्तुता हा कान्होपात्रेच्या वाणीचा स्थायीभाव आहे.
४. संत कान्होपात्रेची अभंगरचना रसाळ, प्रासारिक असून भावार्थतेने ती ओतप्रोत आहेत.
५. संत कान्होपात्रेच्या अभंगातील रसार्द्रता व भावपरिपोष तिच्या त्यागमय जीवनाशी एकरूप होऊन प्रकट झाले आहेत.

**समारोप**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वाङ्मयीन परंपरेत संतांचे कार्य अनमोल आहे. सामाजिक अस्मितेचे ते खरे शिलपकार असल्यामुळे त्यांनी खऱ्या अर्थाने समाज जडण-घडणीचा आलेख मांडला. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र आणून पंढरीच्या पांडुरंगाच्या प्रांगणांत आध्यात्मिक लोकशाहीची प्रतिष्ठापण केली. रूढीग्रस्त अज्ञ जनांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. अभंग, कीर्तन, भारूड, प्रवचन आदि माध्यमातून लोकांना प्रबोधन व उपदेश केला. स्त्रीयांना आणि शुद्रातीशूद्रांना परमार्थाची दारे खुली करून दिली. या सकार्यात ज्ञानेश्वरादी पुरूण संतांसोबतच स्त्री संतांनी देखील भरीव कामगीरी केलीली आहे. त्या स्त्रीसंतांमध्ये यातीहीन अशा गणिका कुळात जन्मलेल्या संत कान्होपात्रेचे स्थान अढळ आहे.

**निष्कर्ष**

१. संतांची स्त्री-शूद्रांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून त्यांचे नैतिक बळ वाढवले.

२. सामाजिक जडणघडणीसाठी संतांनी अध्यात्मिक लोकशाहीचा मार्ग अवलंबला.

३. समाजातील वर्णभेद, उचनिचत्व, विषमता, कर्मकांड, अंधश्रद्धा, अज्ञान या गोष्टींवर संतांनी आपल्या अभंगवाणीने कोरडे ओढले.

४. संत कान्होपात्रेचे अभंग भक्तीने भरलेले असून तिची अभंगवाणी अर्जवी, करूणापर श्रद्धाळू, दास्यभाव, साफल्पभावपर आहे.

५. कान्होपात्रेचे अभंग तिच्या मनातील दुःखदभाव व उत्कट व्यथा यांचे दर्शन घडवणारे आहेत.

६. यातीहीन अशा गणिका कुळात जन्मलेली असतांनाही आपलया आर्तवाणीमुळे आणि निस्सिम भक्तीच्या बळावर कान्होपात्रा संत पदापर्यंत पोहचली आहे.

**संदर्भ**

१. बडवे सतिष –'साहित्याची सामाजिकता' –शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर पृ. १३ ते १७.

२. बागुल फुला –'बहुजनातील संत कवी कवयित्री' – अथर्व पब्लिकेशन्स जळगांव पृ. ४९ते५३.

३. घाटोळे रा.ना. –'मराठी वाङ्मयाचा इतिहास १८४० पासून आजपर्यंत' श्री मंगेश प्रकाशन नागपूर पृ.३३.

४. पाटील शिरीष (संपादक) 'संतांची अभंगवाणी मध्ययुगीन निवडक संत' प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव पृ. ८,९,४९ ते ५१.

# 3.3.2.1 Research Paper Published in UGC Approved Journals

# पावरा आदिवासींचे बदलते जीवन आणि संस्कृतीचे निराळेपण

प्रा.डॉ.प्रकाश श्रीराम साळुंके
मराठी विभाग प्रमुख,कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदूरबार

आदीवासी पावरा लोकांची सामाजिक, सांस्कृतिक व व्यावहारीक जडण-घडण ज्या सातपुडा पर्वतात व त्याच्या पर्वतात झालेली आहे. त्या सातपुडयाशी व त्याच्या पर्यावरणाशी अर्थात प्रदेशाच्या भौगोलिकतेशी त्यांची नाळ घट्टपणे बांधली गेलेली आहे. तेथील कडे-कपारी, उंच उंच शिखरे, नदी-नाले, दाट अशी जंगल झाडी, तेथील शेती, वन्य व पाळीव पशुपक्षी, विविध फळे, कंदमुळे, जडीबुटी, घडगाव तालुक्याच्या उत्तरेस असलेली नर्मदा नदी व अक्कलकुआ नदीच्या दक्षिणेस असलेली तापी नदी यांच्याशी त्यांचे जीवाभावाचे नाते आहे. सातपुडा पर्वत हाच खरा त्यांचा आश्रयदाता, अन्नदाता, पालनहार व सखासोबती. एकूनच सातपुडा पर्वत म्हणजे त्यांचे सर्वस्व. स्वाभाविकपणेच सातपुडयावर त्यांची नितांत श्रध्दा. सातपुडापर्वताला, त्याच्या उंच उंच शिखरांना, तेथील झाडाझुडपांना, विविध वनस्पतींना, हिंस्त्र प्राण्यांना, पाळीव पशु-पक्षाना, शेतीला, शेतीच्या पिके ंना पावरा लोकं देवासमान मानतात आणि विविध सण-उत्सवात भक्तिभावाने त्यांची पुजा अर्चा करतात. त्यांना प्रसन्न करण्यासाठी बकऱ्या कोंबडयांचे नैवद्य व शुध्द मोहफुलांच्यज्ञ दारुचे अर्घ्य देतात आणि ढोलबीरीच्या गजरात सामुहिक नाचगाणी करतात.

आजच्या बदलत्या काळात मात्र स्वातंत्र्यपुर्व काळातील घनदाट अशा आरण्याने व्यापलेल्या सातपुडा दिसत नाही. सातपुडयाच्या पर्यावरणाचा विचार केल्यास विकासाच्या नावाखाली झालेली भरमसाट जंगलतोडीमुळे तेथील पर्यावरणाचा ऱ्हास झालेला आहे. पर्यावरणाने सातपुडयातील जंगलावर, वनऔपजांवर, नदी-नाल्यातील जलचर प्राण्यांवर, वन्य पशुपक्ष्यांवर आपली उपजिवीका भागवणाऱ्या आदिवासी पावरा बांधवांच्या जीवनावर व जंगल संस्कृतीवर फार मोठा आघात झालेला असल्यामुळे त्यांची मुळ आदिवासी जीवनप्रणाली व संस्कृती काहीशी विस्कळीत होऊ पाहाते आहे.

सातपुडयाच्या अतिदुर्गम अशा भागातील पावरा लोकांच्या सामाजिक जीवनपध्दतीत व गावाच्या कारभारात मात्र आजही फारसा फरक जाणवत नाही. गावाचा कारभार पाहणारे गावपाटील, पूजारा, कोतवाल, गावडायले, आणि गावातिल प्रतिष्ठातांच्या हाती गावाची सत्ता आढळते. गावात उद्वलेल्या भल्या-बुऱ्या घटनांचा न्यायनिवाडा गावपंच करतात. त्यांनी दिलेल्या न्याय सर्वमान्य असतो. मात्र शासनाचा रस्ता, विज, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि विकास योजनांच्या धोरणांमुळे व पंचायतराज आणि स्थानिक स्वराज्य संस्थामुळे बदल झालेल्याआदिवासी गाव पाडयात नवे राजकारण सुरु झालेले आहे. गावपाटील ऐवजी गावसरपंचाच्या हातात गावाची सत्ता आलेली आहे. आणि राजकीय गटा-गटाच्या राजकारणामुळे गावातील एकाकी सुरंग लागत आहे. तालुका व जिल्हास्तरावरील व राजकीय सत्ताधिशांनी पाडया-पाडयात व खेडया-खेडयात आपापले गट- तट उभारुन जणू ग्रामव्यवस्थेचे विभाजनच करुन टाकले आहे. गाव पाडयात उद्भवणारे भांडण-तंटे, चोऱ्या-माऱ्या,खून दरोडे, बाई पळवणे आदि गुन्हे गावपंचातीत किंवा जमातपंचायतीत न मिटवता पालिस स्टेशन, कोर्टकचेरीपर्यंत नेल्या जातात.

पावरांच्या विविध सण-उत्सवांची परंपरा मात्र बदलत्या काळातही बदललेली नाही. त्यांचे प्रत्येक सण-उत्सव पुर्वीप्रमाणेच पारंपारीक पध्दतीने साजरी केले जातात. अलिकडे शहरी संस्कृतिच्या लागणीमुळे, शिक्षण व नोकरीमुळे बहुजनांच्या सणांसारखे काही सण साजरे केले जातात.

पावाराच्या लग्न पध्दतीतही काळाप्रमाणे बदल जाणवतो आहे. मात्र वरपित्याकडून वधुपित्याने 'देज' (हुंडा) देण्याची परंपरा आजही कायम आहे. बदलत्या काळात देजच्या रकमेतही वाढ झालेली आहे. पुर्वी एक हजार रुपया पासून पाच - सात हजार रुपया पर्यत देज दिला जात असे. अलिकडे मात्र २५ ते ३० हजारापर्यंत देज दिला जातो. बहुजनांप्रमाणेच लग्नात लग्नपत्रिकाही छापल्या जातात. नातेवाईकांना, मित्राना गावातील लोकांना लग्नाचे आमंत्रण दिले जाते. लग्नात मंडपही टाकला जातो. पारंपारीक वाजत्रीबरोबरच आता बॅन्डवाजाही (डीजे) लावला जातो. मात्र लग्न पारंपारीक पध्दतीने लावले जाते. पुरोहितांकडून लावले जात नाही हे विशेष! मात्र त्यांच्यातील झगडा भरण्याची पारंपारीक पध्दत आज ही नष्ट झालेली नाही.

बदलत्या काळातील पावरा लोकांच्या धार्मीक विधित, सण-उत्सवात पारंपारिक पध्दतीने कोंबडया, बोकडयांचा बळी देणे व दारुचे अर्घ्य देणे आवश्यकच मानले जाते. त्याशिवाय त्यांचा कोणताच सण-उत्सव व विधी पार पडत नाही. तसेच धार्मिक विधीव्यतिरिक्तही दरोरोजच्या शारीरिक कष्टामुळे थकल्या भागल्या शारीराचा थकवा घालविण्यासाठी मोहाच्या दारुचा सर्रास वापर होत असतो. मात्र शिकलेल्या नव्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते आपल्या समाजात जनजागृती करुन समाज परिवर्तनाचे काम करतांना दिसतात ही समाधानाची बाबही उल्लेखनिय आहे.

अतिदुर्गम अशा पहाडी भागात राहणारे पावरा जमातिचे लोक आजही आरोग्याच्या बाबतीत आजही अनभिज्ञ आहेत. नदी नाल्यातील पाणी पिण्यासाठी वापरत असल्यामुळे त्यांना विशेषत: पावसाळयात दुषित पाण्यामुळे डायरिया सारख्या विविध राथींच्या रोगांची व खरुज, गजकर्ण, इसब यासारख्या त्वचारोगांची लागण होत असते. तसेच सिकलसेल नावाचा दुर्धर आजार, हत्तीरोग, क्षयरोग आणि कुपोषणाचे

प्रमाण आजही त्यांच्यात अधिक आढळते. तेथील मंडळी आजही आजाऱ्यास डॉक्टरी इलाज न करता भगतांकडून गंडा-दोरा-ताईत व मंत्रोपचार करुन घेतात कारण जादुटोणा, मंत्रतंत्र, करणी कवटाळ, डाकीणप्रथा आदि गोष्टींवर आजही त्यांचा विश्वास आहे. आजारी पडलेल्या व्यक्तीवर कोणतीही करणी केली असेल म्हणून ते उपचारासाठी त्याला आधी मंत्रिकाकडे घेऊन जातात व शेवटच्या घटके पर्यंत मांत्रिकाकडूनच उपचार करतात. त्यावर आजार आटोक्यात आला नाही तर रोग्यास झोळीत घालून डॉक्टराकडे आणतात. अलिकडे पर्वत पायथ्याशी राहणारे आदिवासी पावरा मात्र आजाऱ्यास मंत्रिकाकडे न घेऊन जाता डॉक्टरांकडे उपचारासाठी आणतांना दिसतात. त्याला कारण म्हणजे शासनाच्या आरोग्य विषयक सुविधांमुळे, नव्या ध्येयधोरणांमुळे ज्या गावपाडयापर्यंत पक्के रस्ते झालेले आहेत तेथे पर्यंत ग्रामीण रुग्नालयांची व डॉक्टरांची सोय केलेली आहे. आरोग्य विषयक जणजागृती निर्माण झालेली असल्यामुळे आजाऱ्यावर डॉक्टरी उपचार केला जातो.

आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांना ही चांगले जीवन जगता यावे यासाठी शासन सर्वकष प्रयत्न करीत आहे. आदिवासींच्या विकासासाठी काढलेल्या विविध सहकारी संस्थामार्फत आदिवासी शेतकऱ्यांना बि-बियाणे, शेतीची अवजारे, खते, औषधे, शेती सिंचनासाठी पंप, बोरवेल्स आदि गोष्टी सबसिडिवर पुरविणे, त्यासाठी वीज पुरवठा करणे, त्यांच्य शेतीमालाची खरेदी करणे, त्यांना जोडधंदा म्हणून गायी, म्हशी, शेळया सबसीडीवर देणे, विविध बँकामार्फत कर्जपुरवठा करणे, बचत गट निर्माण करणे, चारचाकी गाडया, रिक्षा आदि वाहने सबसिडीवर देणे, ग्रामीण रोजगार हमी योजनेतून विविध कामे उपलब्द करुन देणे, सकस आहार योजना राबविणे, कुपोषणाच्या समस्या सोडवणे, दुर्गम भागात पिण्याच्या पाण्यासाठी हॅन्डपंप बसविणे आदि प्रयत्न शासनामार्फत होत आहेत. मात्र वरील विकास योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याचे आढळते. तसेच आजही त्यांच्यात काही प्रमाणात असलेल्या असाक्षरता व अज्ञानामुळेही त्यांच्या विकासाला खीळ बसलेली आहे. त्यांच्या अज्ञानाचा गैर फायदा घेऊन आजही त्यांची लुबाडणूक होत आहे.

आदिवासी पावरांची शेती बारमाही नसल्यामुळे सातपुडयातील आदिवासी पावरांना वर्षभर पुरेल एवढे अन्नधान्य मिळत नसल्यामुळे आजही बहुसंख्य आदिवासी पावरा बांधव महाराष्ट्र लगतच्या गुजरात राज्यात चार-सहा महिने सामासाठी जात असतात. त्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी शासनाने सातपुडा पर्वत भागात उत्पादित होणाऱ्या वनौपजांवर वेगवेगळे उद्योगधंदे सुरु करणे गरजेचे आहे.

बदलत्या काळातील शासकिय सायी-सवलती, जि.प.शाळा, आश्रमशाळा, निवासी, शाळा, विविध खाजगी शैक्षणिक संस्था, शहरीकरणाचा प्रभाव, रस्त्यांच्या सोयी बऱ्याच प्रमाणात निर्माण झाल्यामुळे नव्या पिढीचा शिक्षणाकडे कल वाढत चाललेला आहे. शहराच्या ठिकाणी असलेल्या इंग्रजी शाळामध्ये ही त्यांची मुलं शिक्षण घेऊ लागलेली आहेत. शासनाच्या ध्येय धोरणांमुळे व शिक्षणाच्या प्रचार-प्रसारामुळे बरीच पावरा मंडळी विविध शासकिय व खाजगी संस्थांमध्ये शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ व वरिष्ठ स्तरापर्यंत अधिकाऱ्यांची विविध पदे भुषवित आहेत. तर तुरळक प्रमाणात प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनियरही, होत आहेत. शिक्षणामुळे, नोकरीमुळे व शहरीकरणाच्या प्रभावामुळे त्यांच्या राहणीमानात व आचार-विचारातही परिवर्तन घडले आहे. विज्ञान युगात नव्या पिढीतील शिक्षीतांना विज्ञान व तंत्रज्ञानाची माहिती मिळत असल्यामुळे त्यांना संगणकाचे चांगल्या प्रकारे ज्ञान अवगत होत आहे. विविध नोकरी व्यवसायामुळे त्यांची आर्थीक स्थिती बऱ्यापैकी सुधारत असल्यामुळे त्यांची पारंपारिक कुडाच्या घरांऐवजी सिमेंट कॉक्रीटचे घरे बांधली जात आहेत. त्याचबरोबर सायकली, मोटरसायकली, चारचाकी वाहने, घरात टी.व्ही, फ्रिज, कम्पयुटर, लाकडी फर्निचर आदि विविध वस्तु दिसू लागल्या लागल्या आहेत. खिश्यात मोबाईल वाजू लागले आहेत. शहरीकरणाच्या प्रभावामुळे, शिक्षणामुळे व विविध भाषिकांच्या संपर्कामुळे पावरांची नवी पिढी पारंपारिक पावरी बोली ऐवजी मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्रजी आदि भाषा बोलू लागले आहेत. मात्र शिक्षणामुळे व शहरी संस्कृतिच्या लागणामुळे पाश्चात संस्कृतिचे अंधानुकरण करणारी युवा पिढी आपला सांस्कृतिक ठेवा हरवत चालल्याचे प्रकर्षाने जाणवते.

शिक्षण क्षेत्रातल्या प्रगती बरोबरच सार्वजनिक राजकारणातही त्यांचा सहभाग वाढतो आहे. नंदूरबार जिल्हयातिल अक्कलकुव्वा तालुक्यात पावरा जमातीच्या लोकांची संख्या इतर तालुक्यातील पावरांच्या तुलनेत कमी असल्यामुळे अक्कलकुवा तालुक्यातील पावरांपेक्षा धडगांव, शहादा, तळोदा, आदि तालुक्यातील पावरा लोकं गावच्या सरपंच पदापासून ते थेट आमदारकी पर्यंतची पदेही भुषवित आहेत. राजघराणीही उदयास येत आहेत.

नर्मदा नदीवरील सरदार सरोवर प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या गावांचे अक्कलकुव्वा, तळोदा, शहादा ह्या तालुकांच्या शहरालगतच्या मैदानी प्रदेशात त्यांचे स्थलांतर केल्यामुळे त्यांच्या मुळ आदिवासी जीवनप्रणालीवर व संस्कृतीवर घाव घालल्याचे त्यांना सुरुवातीला वाटत होते. आजही वाटते मात्र शासनाच्या विविध सोयी-सवलतींमुळे,विकास कामांच्या योजनांमुळे, जवळ असलेल्या शहरांमुळे व स्वत:ला बदलवल्यामुळे ही मंडळी आता पुनर्वसनातही रुळलेली आहे. मैदानावरील शेतजमिनीमूळे त्यांची प्रगतीही होतांना दिसते. मात्र ते आपल्या मुळ संस्कृतिपाससून दुर चालले आहेत हे नाकारता येणार नाही. एकंदरीत पाहता आपल्या जुन्या परंपरा टिकवीत वर कधी मोडत हा पावरा समाज नव्या युगाला सामोरा जाऊन काळाशी हातमिळवणी करतोय ही समाधानाचीच बाब आहे.

वरील प्रमाणे पावरा आदिवासींचे जीवन कालमानाप्रमाणे बदलत असतांनाही त्यांच्या मुळ सांस्कृतीशी त्यांची नाळ मात्र पुर्णपणे जुळलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. डॉ. नारे गोविंद - सातपुडयातील भिल्ल : ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा-कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२. डॉ. पगारे म. सु. - पावरा लोकगितातील लाकसंस्कृती - प्रशांत पब्लिकेशन जळगांव.
३. प्रा. पाटील डी. जी. - पावरा समाज व संस्कृती - भाषा संशोधन प्राकशन केंद्र बडोदा.
४. श्री. पावरा सुभाष - सातपुडान सानिध्यामाय आदिवासी पावरा संस्कृती - भाषा संशोधन प्रकाशन, केंद्र बडोदा.

# मानवी हक्क आणि आदिवासी समाज जीवन

प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
कला आणि वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रास्ताविक**

मानवी हक्क हा प्रत्येक माणसाचा जन्मसिध्द हक्क असून समाजजीवनात मानवी हक्कांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी हक्क प्रत्येक मनुष्याच्या अस्तित्त्वाशी निगडित असे मूलभूत हक्क आहेत. जीवनाचा विकास करण्यासाठी मानवी हक्कांची आवश्यकता असते. अअमानवी जीवन निर्भय बनविण्यासाठी मानवी हक्क उपयुक्त ठरतात. मानवी हक्क हे मानवतावादी लोकशाहीचे खरे तत्त्वज्ञान आहे. मानवी हक्कांव्दारे मानवाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. आज प्रत्येक नागरिकाला मानवी हक्कांची प्राप्ती करण्याचा अधिकार आहे. हक्कांशिवाय माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्तता येऊ शकत नाही. प्रा. एच. जे. लॉक्सीच्या मते हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याच्याशिवाय व्यक्तीला सामान्यत: स्वत:चा सर्वांगीण विकास करुन घेणे शक्य होत नाही. प्रा. बोंझाके यांच्या मते, आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे मानवी हक्क होय. तर टी. एच. ग्रीन यांच्या मते, मानवाच्या अंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होत. मानवी हक्क हा राजकीय तत्त्वज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. जॉन लॉक हा मानवी अधिकारांचा प्रभावी समर्थक मानला जातो. जॉन लॉकने संपत्तीचा, स्वातंत्र्याचा व जीवन जगण्याचा या तीन अधिकारांचा समावेश मानवी हक्कामध्ये केला. लॉकच्या मते हे मानवी अधिकार निसर्गाची जन्मत: व्यक्तीला लाभलेली देणगी असून ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही.

प्राचीन काळापासून मानव मानवी हक्कांचा वापर करीत आला आहे. मात्र, त्या काळात समाजात धर्मांधता ताठर असल्यामुळे मानवी हक्कांची कुचंबणा झाली. मध्ययुगीन काळात समाजात राजेशाही व सरंजामशाहीमुळे मानवी हक्क धोक्यात आले. मात्र, धर्मसुधारणा चळवळ, समाजसुधारकांचा उदय, औद्योगिक क्रांती, लोकशाही शासन पध्दती यामुळे मानवी हक्कांना महत्त्व प्राप्त झाले.

मध्ययुगीन काळात मानवी हक्कांचे समर्थक जॉन, लॉक, रुसो मिल, लॉकी इ. पाश्चिमात्य विचारवंतांनी केलेले आहे. गौतम बुध्द महावीर, सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त, गॅलिलिओ, महात्मा फुले, राज शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी आपले आयु मानवी हक्कांसाठी खर्ची घातले. तर आधुनिक काळात सिंधुता सपकाळ, अण्णा हजारे, मेधा पाटकर यांचे कार्य मानवी हक्काला प्रे देणारे आहे. मात्र, स्वातंत्र्यानंतर भारतात आजही आपल्या हक्कास प्रत्येक समाजाला संघर्ष करावा लागत आहे. महिलांना संरक्षण बालकामगार, शेतकरी यांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होत भारतीय समाज व्यवस्थेतील अशा अनेक घटकांपैकी आदिवा जमातीलाही आपल्या हक्कांसाठी सतत संघर्षच करावा लागत आ

**आदिवासी समाज**

आदिवासी समाज हा भारतीय समाजातील दुर्बल घटक एक होय. आदिवासी समाजाला मूल निवासी, वनवासी, ज राजे, आदिम जमाती, भूमिपुत्र अशा वेगवेगळ्या नावांनी स जाते. भारतीय राज्यघटनेत आदिवासी जमातींचा उल्लेख अनु जमाती असा करण्यात आला आहे.

आदिवासी समाज म्हणजे प्रगत समाजापासून अलिप्त अस दूर रानावनात व डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा आणि धर्म बोली इ. बाबतीत समानता असलेला असा साधा सामाजिक समूह गिलीन व गिलीन यांनी आदिवासी समाजाची एका विशिष्ट भूप्रदे वास्तव्य करणारा, समान बोलीभाषा बोलणारा आणि समान संस्कृ जीवन जगणारा परंतु अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटांचा समू म्हणजे आदिवासी समाज होय, अशी व्याख्या केली. तर डी. मुजुमदार यांनी समान नाव धारण करणारा, एकाच मर्यादित भू-प्रदेश वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय इ. बाब समान निषेध नियमांचे पालन करणारा आणि परस्पर उत्तरदायित्व एक पध्दतशीर व्यवस्था असलेला असा अनेक कुटुंबाचा समुच्चय म् आदिवासी समाज होय, अशी व्याख्या केली आहे.

JRD Vol. 08(Special Issue 06) Feb.2018, (ISSN-2230-9578) UGC Jr. List No. 64768, COSMOS I.F. 4.270

# अक्कलकुवा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचे सांस्कृतिक दर्शन घडवणारा उत्सवः होलीकोत्सव

डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री, ता. साक्री जि, धुळे

## प्रस्तावना :-

अक्कलकुवा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीची खास वैशिष्ट्येपूर्ण अशी आदिम परंपरेशी नाते सांगणारी संस्कृती आहे. ते ज्या पहाड-पर्वतात राहतात. तेथील पर्यावरणाशी त्यांचे जीवन निगडीत आहे. शतकानुशतकापासून ही जमात निसर्गसन्मुख जीवन जगत आहे. म्हणजे त्यांचे जीवन पध्दती पारंपरिक निसर्गपूजक आहे. अन्न, वस्त्र व निवाऱ्याच्या प्राथमिक आणि मर्यादित गरजा भागवणारी ही जमात आर्थिक दृष्ट्या कमकुवत असली तरी सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय संपन्न व समृध्द आहे. सांस्कृतिक विविधता आणि संपन्नता यांचा विचार करता राना-वनाच्या आश्रयाने आपल्याच अनोख्या मस्तीत जीवन जगणाऱ्या पावरा आदिवासी जमातीच्या लोकांनी आपले सांस्कृतीक वैभव आजही आबाधीत ठेवले आहे.

आदिवासी पावरा जमातीत विविध सण-उत्सवांना व पूजाविधींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यातून त्यांच्या आदिम संस्कृतीचे आगळे-वेगळे दर्शन घडते. ते राहत असलेल्या पर्यावरणातील ऋतुंचे बदलते रंग आणि त्यातील अद्भूत चमत्कार ते कायम अनुभवत असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक जडण-घडणीवर झालेला आहे. त्यांचे सण-उत्सव विविध श्रध्दा-समजूतींवर आधारलेले असल्यामुळे त्या श्रध्दा समजूतीपोटी म्हणा किंवा त्यांच्यातील भितीपोटी म्हणा ते निसर्गसृष्टीतील विविध चमत्कारांना मनोभावे पूजत असतात. त्यांच्या सण-उत्सवांचे व पूजाविधींचे स्वरूप सार्वजनिक व सामुहिक असल्यामुळे त्यांच्यात सामुहिक आनंदाचे वातावरण निर्माण होत असते. गावकरी व नातेवाईक यांच्या भेटीगाठी होत असतात. परिणामी एकमेकांच्या विचारांचे आदान-प्रदान होत असते. खुशलक्षेम कळत असते. त्या निमित्ताने सामुहिक भोजनाचा आनंद घेतला जातो. आदिवासींच्या सण-उत्सवांच्या बाबतीत श्री. विरसिंग पाडवी यांनी 'आदिवासी जीवन संघर्ष' या लेख संग्रहात म्हटले आहे की, "आदिवासींच्या सण-उत्सवांच्या सार्वजनिक कार्यक्रमामुळे विखुरलेला आदिवासी समाज एकत्र येतो. माणसे व मने जोडली जातात. त्यामुळे सामाजिक विकास घडायला मदत होते आणि सामाजिक मूल्ये देखील जोपासली जातात व आपली ओळख कायम राहते." डॉ. म. सु. पगारे पावरांच्या सण-उत्सवांच्या बाबतीत म्हणतात, "सण-उत्सव लोकांना एकत्र आणून मनोमिलन घडवितात. लोकांमध्ये आनंद निर्माण करतात प्रत्येक घरात गोडधोड पदार्थ केले जातात नातेवाईकांना बोलावतात. घरातल्या मंडळींना नवे कपडे घेतात सण-उत्सवाच्या निमित्ताने घरातील सर्वांनी एकत्र येऊन नातेवाईकांसहित आनंद उपभोगण्याची संकल्पना रूढ आहे. सर्व एकत्र आल्यावर जो शाब्दीक आविष्कार होतो त्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. या लोक संस्कृतीतून त्यांच्या रूढी-परंपरा, आचार-विचार, विधी-संकेत यांचेही दर्शन घडते." आदिवासी पावरांचे अभ्यासक श्री. डी.जी.पाटील म्हणतात "पावरा लोकांचे सण-उत्सव त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे खास वैशिष्ट्यपूर्ण अंग आहेत. त्यात त्यांच्या आदिवासी जीवनाच्या रूढी-परंपरांचे दर्शन होते." आदिवासी साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासींच्या सण-उत्सव व पूजाविधीच्या बाबतीत म्हटले आहे की, "आदिवासी भिल्ल समाजातील सण-उत्सव आणि पूजाविधीचे स्वरूप निसर्गातील सचेतन शक्तींशी, नवनिर्मितीशी आणि माणसांचे दैनंदिन जीवन सुसह्य करण्याच्या प्रक्रियेशी परंपरेने बांधलेले आहे." वरिल अभ्यासकांच्या मत-मतात्तरातून असे म्हणावेसे वाटते की आदिवासी पावरांच्या विविध सण-उत्सवातून त्यांच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

आदिवासी पावरांच्या सण-उत्सवात, पूजाविधीत मोहफुलाच्या मध्याला व बळीप्रथेला आगळे वेगळे महत्त्व असल्यामुळे त्यांचे कोणतेच सण-उत्सव, पूजाविधी मद्याविना व बकऱ्या-कोंबड्यांच्या बळीविना पार

पडत नाहीत. सण-उत्सवात मोहफुलाचे मद्यप्राशन केले की अबालवृध्द स्त्री-पुरूष ढोल-बिरीच्या नादात सामुहिक नाचगाणे करतात व आपला सण साजरा करतात. म्हणजे त्यांच्या सण-उत्सवांतून सामुहिकतेची व सार्वजनिकतेची संकल्पना रूढ होते. व त्यातून त्यांच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

आदिवासी पावरा जमातीत साजऱ्या केल्या जाणाऱ्या विविध सण-उत्सवान पैकी महत्त्वाचा उत्सव म्हणजे होलिकोत्सव होय.

### आदिवासी पावरांचा होलिकोत्सव :-

अक्कलकुवा तालुक्यातील डोंगर-दऱ्यात राहणाऱ्या निसर्गपूजक पावरा जमातीच्या जीवनात 'होळी' या ऐतिहासीक व सांस्कृतीक परंपरा लाभलेल्या महोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आनंद आणि उत्साहाचे प्रतिक असलेला हा सण अक्कलकुवा तालुक्यातील पहाडपट्टीत पंधरा दिवस धामधुमीत साजरा केला जातो. दांडी पौर्णिमेपासून खऱ्या अर्थाने ह्या सणाची सुरूवात होत असते. या होळीच्या सणास पावरा बोलीत हुवी/ऊली/हवावी असेही म्हणतात. फाल्गुन महिण्यात चंद्रकोर दिसल्याबरोबर 'ओली आली उलूंsss लूलूsss ईsss वै'(होळी आली मजा करूया) असे म्हणत ढोलांच्या गजरात नाचत गात होळीमातेचे स्वागत केले जाते. फाल्गुन महिण्यातील त्यांचा हा शेवटचा सण असल्यामुळे ते या सणाचा फार आनंद लुटतात. शेतीचा हंगाम संपलेला असतो. होळी माता आपल्यावर कृपा करते. तिच्या कृपेने गावातली इडा-पीडा जावून गावात सुखशांती व समृध्दी नांदते. आपली मनोकामना पुर्ण होते. म्हणून होळी मातेला ते नवसही मानतात. तो नवस फेडण्यासाठी पाच दिवस पाडोपाडी जावून ढोल बिरीच्या नादात नाचतात व पैशांच्या आणि धान्याच्या स्वरूपात लोल/फाग/वर्गणी मांगतात व होळीमातेची मनोभावे पूजाअर्चा करतात. आदिवासी पावरा बांधवाच्या होळी सणाच्या या पंधरा दिवसांच्या धामधूमीत गुलाल्या बाजार, भोंगऱ्या बाजार, होळी, मेलादा, रंगपंचमी, गोटखाणे असे महत्त्वाचे उत्सव साजरे होत असतात.

### गुलाल्या बाजार :-

आदिवासी पावरांच्या होळी सणाच्या पंधरा दिवस अगोदर भरणारा आठवडे बाजार हा 'गुलाल्या बाजार' म्हणून भरत असतो. या बाजारात वयस्कर मंडळी व नातेवाईक भेटल्यानंतर एकमेकांना विचारपूस करीत एकमेकांना गुलाल लावून राम-राम करून गळाभेट घेण्याच्या पध्दतीमुळे ह्या बाजाराला 'गुलाल्या बाजार' असे नाव पडले आहे. या बाजारात युवक-युवतींमध्ये वधू-वर संशोधनाचे कार्यही होत असते. एखाद्या तरूणास तरूणी पसंत पडली तर तिच्या गालाला गुलाल लावून आपली पसंती दाखवून दोघांच्या पसंतीअंती दोघे पळून जावून लग्न करायचेत. बाजारातून लग्नासाठी पत्नी मिळवणे ही भुषणावह बाब मानली जायची. अलिकडे मात्र असे प्रकार क्वचितच घडतात.

### भोंगऱ्या बाजार :-

गुलाल्या बाजारानंतर येणारा आठवडे बाजार हा 'भोंगऱ्या बाजार' म्हणून प्रसिध्द आहे. या बाजारात परिसरातील पावरा लोक आपआपले ढोल घेवून येतात. मानाचा ढोल सर्वांच्या पुढे असतो नंतर गावाचे व इतर गावांचे ढोल असतात. त्यांची गावातून मिरवणूक निघते मिरवणूकीत गावाचा पाटील पारंपारिक वेशात असतो. त्याच्या खांद्यावर बंदुक किंवा हातात तलवार असते मिरवणूकीतील लोकं धनुष्यबाण, भाले, काठ्या घेवून नाचतात. वाजत गाजत ते गावदेवळात येतात. देवाची मनोभावे पूजा करून सायंकाळी ढोल वाजवत आपापल्या गावी परतात. काही ठिकाणी ढोल स्पर्धाही भरवण्यात येते. या बाजारात सणानिमित्ताने घरातील लहान-थोरांसाठी कपडे, संसारोपयोगी वस्तू, महिलांचे साजश्रृंगार व होळीच्या सणासाठी लागणारे डाळ्या, मुरमुरे, गुळ, खोबरे, हार-कंगण, खजूर अशा खाद्य पदार्थांची व रंगीत कागदे, वेगवेगळे रंग, मोरपीसांचे टोप, कमरेचे व पायांचे घुंकरु अशा विविध वस्तूंची खरेदी केली जाते.

### होळी व मेलादा :-

होळी हा पावरा आदिवासी लोकांचा सर्वात महत्त्वाचा व मोठा उत्सव असतो. गावाचा पाटील, कोरवाण्या(पूजारी) बावा, बुध्या, काली, नांगरा (निचक्या), घोडेस्वार, दरवेशी अशी मानतेची विविध सोंगे घेणाऱ्या सर्व लोकांचे होळीच्या पाच दिवस आधी कडक व्रत पाळलेले असते. प्रत्येकाच्या घरी मात्र मोहफुलांची शुध्द दारू तयार केलेली असते. बकऱ्या-कोंबड्यांचे बळी देऊन केलेले मटण व शुध्द मोहाची दारू हे त्यांच्या प्रत्येक देवाचे नैवद्य असते. तोच नैवद्य होळी मातेलाही दिला जातो.

होळीच्या एक महिना आधी दांडी पोर्णिमेला होळीच्या ठिकाणी सावराचा दांडा गाडतात. शेणाच्या तीन

गोवऱ्या ठेवून त्यांना कच्चे सूत गुंढाळतात त्याला 'दांडा मेकणू' असे म्हणतात. होळी साठी लागणाऱ्या बांबूलाही सूत बांधतात. होळीच्या दिवशी होळीसाठी लागणारा बांबू जमिनीतून मुळासकट काढतात व होळीच्या ठिकाणी आणतात. त्याच्या शेंड्याला खोबऱ्याच्या वाट्या, पापड, पळसाची फुले, सफेद ध्वज लावून खड्यात गाडतात. आजूबाजूला लाकड व गोरऱ्या टाकतात. तो पर्यंत होळीची मानता असणाऱ्या विविध सोंगाना सजवतात. गावातील लहान-थोर, स्त्री-पूरूष दारू पेऊन ढोल वाजवून एका तालासुरात होळीभोवती घेर धरून नाचतात. त्याला 'गेरनृत्य' असे म्हणतात.

पहाटे चार-पाच वाजता गावपाटील व पूजारा दोघे होळीची पूजा करतात व होळी पेटवतात. ती पेटती होळी पुव दिशेला पडल्यास शुभ मानतात. होळीचा जळालेला बांबू खाली ठेवल्यानंतर होळीची शेंडी प्रथम गावपाटील धाऱ्याच्या किंवा विळ्याच्या सहाय्याने एकाच घावात तोडतो. नंतर पूजारी तोडतो. नंतर गावातील इतर लोक तोडतात व होळी मातेला पुजून नैवद्य देतात. होळी मातेला नारळ अर्पण करतात व नमस्कार करून तिची रक्षा कपाळाला लावतात आणि घरीही घेऊन येतात. कुणाला उन्हाची झळ लागल्यास किंवा भूतबाधा झाल्यास त्याला ती रक्षा लावण्यासाठी उपयोगी पडते असे सांगतात.

होळीच्या दुसऱ्या दिवशी मेलादा भरवला जातो. या कार्यक्रमात पटांगणात आयताकृती खड्डा खोदून त्यात लाकडं जाळून निखारा करतात व पेटलेल्या निखाऱ्यावर गावपाटील आणि पूजारा चालतात. चालतांना मात्र होळी मातेच्या कृपेने त्यांना कोणतीच इजा होत नसल्याचे सांगतात एवढी त्यांची श्रध्दा आहे. या कार्यक्रमासही लोक ढोल पावरीवर नाचगाणे करतात. नंतर दुसऱ्या दिवसापासून पाच दिवस होळीची मानता मानलेल्या लोकांनी विविध सोंगे तयार करून गावोगावी जावून नाचतात. तेव्हा गावातील श्रध्दाळू लोकं त्यांना ऐपतीप्रमाणे पैसे, धान्य, दारू आणि कोंबडेही दान म्हणून देतात. पाच दिवसानंतर नदीवर जावून अंघोळ करतात व मिळालेल्या दानाचा प्रसाद म्हणून सेवन करतात तेव्हा त्यांचा नवस फिटल्याचे समजातात.

होळीनंतर पाचव्या दिवशी सकाळी होळीची राख घेऊन घरोघरी फिरतात दिसेल त्याला लावतात हीच त्यांची रंगपंचमी होय. दानाच्या मिळालेल्या पैशांनी कोंबडे विकत घेतात व होळी जाळलेल्या ठिकाणी त्या कोंबड्याचा बळी देऊन तीथेच जेवण करतात. यालाच 'गोटखाणे' असे म्हणतात.

अशा प्रकारे पंधरा दिवस चालणाऱ्या 'होळी' या सणाला आदिवासी पावरा समाजात अनमोल असे महत्त्व आहे. या सणातून खऱ्या अर्थाने त्यांची निसर्ग संस्कृती प्रत्ययाला येते.

**सारांश :-**

निसर्गाशी पूर्णपणे समरस झालेल्या पावरा आदिवासींचा निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा, समुह शक्ती-भक्तीचा आगळा वेगळा आविष्कार दाखवणारा, शतकानुशतकांच्या पारंपरिक संस्कृतीचा समृध्द वारसा स्वतःतून जतन करणारा, जगण्याची प्रेरणा देणारा, गावातली इडा-पीडा नष्ट करून सुखसमृध्दी देणारा, सर्वांना एकत्रीत आणणारा, सर्वांचा आनंद आणि उत्साह व्दिगुणीत करणारा, महिन्याआधी सुरू होऊन होळीनंतरही आठवडाभर चालणारा हा होलिकोत्सव म्हणजे आदिवासी पावरा बांधवांचा खऱ्या अर्थाने सांस्कृतीक उत्सव होय. सामुहिकतेने साजरा केला जाणारा, निसर्गाशी नाते सांगणारा, पर्यावरणपूरक व मानवतेचे दर्शन घडवणारा हा सण त्यांच्या सांस्कृतीक जीवणाचे खास वैशिष्ट्येपुर्ण असा सण होय. या सणातून त्यांच्या लोकसंस्कृतीचे खरे दर्शन घडते.

**संदर्भसूची :-**


१) श्री. विरसिंग पाडवी :- आदिवासी जीवन संघर्ष
२) डॉ. म. सु. पगारे :- पावरा लोकगीतातील लोकसंस्कृती, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.
३) डी. जी. पाटील :- पावरा समाज व संस्कृती, भाषा संशोधन प्रकाशन केंद्र बडोदा.
४) डॉ. गोविंद गारे :- सातपुड्यातील भिल्ल- ऐतिहासिक सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
5) श्री. सुभाष पावरा :- सातपुडान सानिध्यामाय आदिवासी पावरा संस्कृती, भाषा संशोधन प्रकाशन केंद्र बडोदा.

# गोतावळा : स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या कृषी व ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी.

डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके, सी.गो.पाटील. महाविद्यालय, साक्री

**प्रास्ताविक :**

१९६० नंतर ग्रामीण लेखकांची नवी पिढी उदयास आली. उद्धव शेवाळे, रा. रं. बोराडे, डॉ. आनंद यादव, डॉ. मधु मंगेश कर्णीक, महादेव मोरे, ना. धों. महानोर आदि लेखकांनी महाराष्ट्राच्या विविध भागातील ग्रामीण जीवन शब्दांकीत केले आहे. आनंद यादव यांनी कादंबरीतील निवेदनासाठी ग्रामीण बोलिचाच अवलंब करून तीची अविष्कार क्षमता वाढवली आणि, 'गोतावळा' या कादंबरीतून स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या ग्रामीण वास्तवाला हात घातला.

डॉ. आनंद यादव यांची अनेक अर्थांनी गाजलेली 'गोतावळा' ही पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीने मराठी व ग्रामीण कादंबरीला नवे परिणाम प्राप्त करून दिले. १९६० नंतर शेतीवरती यांत्रिकीकरणाचा जो परिणाम झाला त्यामुळे जुन्या पारंपरिक संस्कृतीची हारवलेली मूल्य आणि नव्या यांत्रिकीकरणाने माणासाच्या संबंधापेक्षा रुक्ष व्यवहाराकडे झुकलेली व्यवस्था या कादंबरीत आनंद यादव यांनी अतिशय तरल संवेदनशिलतेने मांडली आहे. ग्रामीण माती आणि ग्रामीण संस्कृती यांचे सखोल प्रतिबींब या कादंबरीत पडलेले दिसते. शेती मातीत अव्याहतपणे राबवणारा सर्वसामान्य माणूस नारबा हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. शेती हा त्याचा अंत्यत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्या शेतीत तो सतत राबराब राबतो. मात्र त्याचा मालक त्याच्या कामविषयक भावनांची कोंडी करतो. नारबाचे लग्न आज करतो उद्या करतो असे करत नारबाची जवानी मातीतच जाते. आधुनिक यंत्रसामुग्रीमुळे शेतातलेही त्याचे भावविश्व उखडले जाते. त्याच्या जिवनाची शोकांतीका होते. बदलत्या वास्तवाचे चित्रण त्यातून अंत्यत नेमकेपणाने व्यक्त होते. त्याचबरोबर या कादंबरीला कलात्मकतेची जी उची लाभलेली आहे. त्यामुळे या कादंबरीने मराठी साहित्य विश्वात खळबळ मांजवून दिली आहे. गोतावळामधुन विविधांगी दर्शन आपल्याला दिसते. प्राणीसृष्टीचे अनोखे दर्शन घडवितांनाच ते ग्रामीण जिवनावर आलेल यंत्रसंस्कृतीचे सावटही दाखवतात. कृषीसंस्कृतीचे दर्शन घडवतांना कादंबरीचा नायक हा शेतमजूर दाखवतात. त्या नायकाच्या मनात माजणारी खळबळ मानसशास्त्रीय दृष्टीने मांडतात. मातीशी त्याचे जिव्हाळ्याचे नाते आहे. माती त्यातून निघणारी पिके, निसर्गाची बदलती रूपे आणि गुरेढोरे यांच्याशी नारबाचे जवळचे नाते आहे. गोतावळा कादंबरीच्या निवेदनात कमालीची सहजता आणि नैसर्गिकता आहे. भावस्पर्शी आणि उत्कट संवादामुळे तिला अधिक जिवंतपणा लाभला आहे. कोल्हापुरच्या ग्रामीण भागातील ग्रामीण बोलीचा सहज आविष्कार तिच्यात आलेला आहे. वास्तववादी जीवनचित्रण हे या कादंबरीचे बलस्थान आहे. आधुनिकीकरणाने ऱ्हास पावणाऱ्या ग्रामीण संस्कृतिचे विदारक चित्रण या कादंबरीत केलेले आहे.

**गोतावळा कादंबरीतील सास्कृतिक संघर्ष :**

गोतावळा कादंबरीत पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक यंत्रयुग यांच्यातील संघर्षाचे चित्रण केलेले आहे. पारंपरिक संस्कृतीचे प्रतिनिधीत्व या कांदबरीतून नायक नारबा करतो. शेतमळ्यातील प्रणीविश्वाचा गोतावळा हा नारबाचा जिवाभावाचा सोबती आहे. इथे चालणाऱ्या जिवनाला एक सांस्कृतिक वारसा आहे. जी या संस्कृतीत बैलांच्या खांद्यावरती शेती संस्कृती जोपासली जात होती. वर्षभर शेतात कष्ट करणाऱ्या बैलांची पोळ्याच्या दिवशी देव म्हणून पूजा केली जाते. त्यांना गोडधोड खाऊ घातले जाते. नेहमी चालणारी मळ्यातील विहीरीवरील मोट, तिच्यामुळे हिरवेगार असलेले मळे पाखरांच्या किलबिलाटाने आळवलेले सुर असायचे. गायी-म्हशींनी, रेड्या-बैलांनी, बकऱ्यांनी गोठे भरलेले असायचे. कोंबड्यांचा, कुत्र्या-मांजरांचा घरातून सर्रास वावर होता. माणसांच्या कामाला किंमत होती. भावनिक नात्याला अर्थ होता. याच साऱ्या विश्वाशी नारबा केंद्रीभुत होता. तो आपल्या भाव भावना, विकार-वासना, याचे साम्य प्राणीसृष्टीमध्येच शोधायचा. त्यांच्याशीच तो संवाद साधायचा.

कोल्हापूरचा पाहुना रामू सोनवडे नारबाच्या मालकाकडे येतो व आधुनिक शेतीच्या सहाय्याने आपल्याला अधिक फायदा होत असल्याचे सांगून ट्रॅक्टर घेण्यास प्रवृत्त करतो. त्यामुळे शेतीकडे पाहण्याची त्याची दृष्टी बदलते. त्याला ट्रॅक्टर घ्यायचा असतो. म्हणून तो व्यवहारवादी बनतो. आपल्याकडे असलेल्या प्रत्येक गोष्टीचा पैसा कसा करता येईल त्याचा प्रयत्न करतो. गोठ्यातील ऐक-ऐक जनावर विक्रीला काढतो. टिक्की म्हैस विकतांना नारबाचे मन गलबलून येते. रेडं विकून टाकलं, थोरली बैलही विकली, गायीपासून काही उपयोग होत नाही म्हणून तीला पांजरपोळात नेऊन सोडली. म्हालिंग्या बैलाचे मरण जवळ आल्यावरही मालकाने त्याला महारांना पन्नास रुपयाला विकला. बेगुमान वागणारा कोंबडा

कापतांना नारबाच्या मनाच्या चिंध्या झाल्या. नारबाच्या जिवाभावाचा एकेक संवगडी कमी होतांना नारबाचे अंतःकरण हादरून निघते. शेतातला जूना पिंपळही मालक विकून टाकतो. तो तोडल्यामुळे सारा माळ भुंडा होतो. पाखरांचं, माणसांचं ऊन-वाऱ्यात विसावा घेण्याचं स्थानच निघून जातं. म्हणून नारबाला पिंपळ तोडल्यामुळे एक कालपुरूषच गेल्याचे दुःख होते.

मालक ट्रॅक्टर घेऊन येतो. त्यावेळी नारबाचे अस्तित्त्व धोक्यात येते. ट्रॅक्टरचा ड्रायव्हर नारबावर हुकुमत गाजवण्याचा प्रयत्न करतो. मात्र त्याने सांगितलेले काम नारबा करत नाही. ड्रायव्हर चाण्या बैलाला बेदम मारतो. तेव्हा नारबा त्याला यापुढे तू बैलाला मारून तर बघ असा दम देतो. ड्रायव्हर मालकाला नारबाविरूध्द सांगतो तेव्हा मालकही नारबाची बाजू न घेता तुला सोसवत नसेल तर तुझी वाट धर असे नारबाला सांगतो. त्यावेळी नारबाच्या जिवनाची घालमेल होते. त्याचे भावविश्वच कोसळते.

अशा प्रकारे बदलत्या कृषी व ग्रामीण वास्तवाचे चित्रण गोतावळा या कांदबरीत केलेले आहे.

**सारांश :**

डॉ आनंद यादव यांनी 'गोतावळा' या कादंबरीतून बदलत्या कृषी व ग्रामीण वास्तवाचे चित्रण केलेले आहे. नारबा हा शेतमजूर या कादंबरीत नायक म्हणून घेतलेला आहे. शेतमळा व त्यात असलेले प्राणीविश्व हाच नारबाचा जिवाभावाचा गोतावळा आहे. अत्यंत निष्ठेने काम करणारा, प्राण्यांना जीव लावणारा, त्यांच्याशी संवाद साधणारा, त्यांना मुला बाळाप्रमाणे प्रेम देणारा, स्वतःचे दुःख प्राण्यांच्या दुःखात पाहणारा, शेतात राबराब राबणाऱ्या ह्या नारबाचे मालक रामू सोनवडे खऱ्या अर्थाने कोणतेच हित पाहत नाही. त्याचे शोषणच करतो. आधुनिक शेती करण्याच्या निमित्ताने ट्रॅक्टर घेण्यासाठी एकेक जणावर विकतो. मात्र एकेक जनावर नारबापासून दूर जातांना नारबाला फारच दुःख होते. शेतटी मालक ट्रॅक्टर आणतोच आणि एका सांस्कृतिक, पारंपरिक अशा भावविश्वाचा अस्त ट्रॅक्टरच्या आगमनाने होतो. पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक यांत्रिक संस्कृती या दोन सांस्कृतिमधील संघर्षाचे चित्र गोतावळा कादंबरीत ठळकपणे जाणवते.

**संदर्भसूची :**

१) डॉ. आनंद यादव - गोतावळा
२) डॉ. रविंद्र ठाकूर - मराठी, ग्रामीण , कादंबरी
३) डॉ. तानाजी राऊ पाटील - मराठी कादंबरी : समिक्षा
४) डॉ. मनोहर सुरवाडे - ग्रामीण साहित्य प्रकार स्वरूप आणि चिकित्सा.

Journal of Research & Development
Vol. 8 (Issue 05), April, 2018
(ISSN-2230-9578)



# साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतांतून प्रतिबिंबीत झालेले 'श्रीक्षेत्र पंढरपूर आणि श्रीविठ्ठल' विषयीचे चित्रण

प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके
सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री जि.धुळे.

**प्रास्ताविक :-**

खानदेशात अहिराणी ओवीगीतांची परंपरा अतिप्राचीन असून. ओवीगीतांचे समृध्द् दालन आहे.'ओवीगीत' हा खानदेशातील अशिक्षित स्त्रीयांच्या अहिराणी बोलीतील प्रभावी आणि भावसंपन्न असा गीतप्रकार आहे. 'ओवीगीत' हे एकप्रकारचे स्त्रीधनच आहे आणि ते स्त्रीधन साक्री तालुक्यातील अशिक्षित स्त्रीयांनी मौखिक परंपरेने आजदेखील जतन केलेले आहे. या ओव्यांतून स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंना, मानवी विविध नात्यांना जसे विशिष्ट स्थान आहे तसेच गावखेडयातल्या देवभोळया संस्कृतीत मनोभावे पूजल्या जाणाऱ्या विविध देवदैवतांचे व तीर्थक्षेत्रांचेही वर्णन केलेले आहे.

पंढरपूरचा श्रीविठ्ठल हा खानदेशवासीयांचाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व अठरा पगड जातीच्या लोकांचे आणि भारतातील ओक संप्रदायांपैकी पुरातन व एक प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वारकरी संप्रदायाचे आराध दैवत असून पंढरपूर हे या वारकरी संप्रदायाचे प्रमुख तीर्थक्षेत्र होय. वारकऱ्यांची काशी म्हणजे पंढरपूर. पंढरीचा पांडुरंग आणि त्याचे भक्त यांचा मिलनसोहळा म्हणजे आषाढी एकादशी. हा आषाढी एकादशीचा सोहळा म्हणजे महाराष्ट्रातील वारकऱ्यांचा सर्वात मोठा लोकोत्सव होय. या सोहळयास माल- दरमाल पायी पायपीट करीत महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातील वारकरी पंढरपूरास आपल्या आराद्य दैवतास भेटण्यास येतात. मात्र या पायपीटीचा जराही थकवा त्यांना वाटत नाही.'ज्ञानबा- तुकारामाचा' गजर केला की त्यांचा थकवा पूर्ण नाहीसा होतो. टाळ- मृदुंगाच्या गजराज्ने अपार हाऊन निघालेला हा जनसमूदाय घर- संसाराची तमा न बाळगता विठ्ठलाला भेटण्यासाठी पंढरीच्या दिशेने झपाझप पाऊले टाकू लागतो. कारण त्यांच्या डोळयांना आनंदाचे क्षण पहावयास मिळतील, भक्तांचा मेळा दिसेल, रुख्मिणीचा पांडुरंग पहावयास मिळेल. टाळ- मृदुंगाच्या गजराने कान धन्य होतील. संसारातील विविध तापांनी तापलेल्या जीवाला सुख- समाधान मिळेल कारण 'दक्षिणद्वारावती' म्हणून ओळखले जाणारे पंढरपूर हे नुसते तीर्थक्षेत्र नसून साधुसंतांसह संपूर्ण संसाराच्या सासुरवासाने त्रस्त झालेल्या अखिल मानवयोगाचे माहेर आहे.

**श्रीक्षेत्र पंढरपूर आणि श्रीविठ्ठल विषयीचे चित्रण :-**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील, अठरापगड जाती धर्मांच्या वारकरी संप्रदायातील वारकरी आषाढी व कार्तीकी एकादशीला सर्व तीर्थांचे माहेरघर असलेल्या पंढरपूरला विठूमाऊलींच्या दर्शनासाठी टाळ- मृदुंग- वीणा यांच्या तालावर ठेका घेत विठूमाऊलीचा जयघोष करीत भावपूर्ण आणि उत्साहवर्धक वातावरणात श्रीक्षेत्र पंढरपूरला जात असतात त्याला खानदेशातील धुळे जिल्हयाच्या साक्री तालुक्यातील विविध खेडयातील वारकरीही अपवाद नाहीत. विठूमाऊलींचे दर्शन घेण्यासाठी आषाढी वारीला पंढरपूरच्या दिशेने पायी निघालेली ही अशिक्षित स्त्री जेंव्हा पंढरपूरला जाते तेंव्हा विठ्ठलाचा वाडा ( मंदीर) कोणता आहे याचा मनात विचार करते व म्हणते-

"पंढरीका जावू ईठ्ठल भाऊना कोनता वाडा
नामदेवनी पायरीवर जनाबाई घाले सडा"

विठ्ठलाच्या भक्तीरंगात रंगलेली, स्वतःला नामदेवाची दासी म्हणवून घेणारी जनाबाई तीला नामदेवाच्या पायरीवर सडा घालतांनाचा भास होतो व हाच विठ्ठलाचा वाडा ( मंदीर) असल्याचे तीच्या लक्षात येते पंढरपूरच्या हया विठ्ठलाला कोणी माऊली, कोणी आई, कोणी बाप, कोणी राया, कोणी सखा म्हणतो तर ही स्त्री त्याला ' भाऊ' म्हणतांना दिसते व आपल्या भावाला

भेटण्याच्या आत्मिक तळमळीने आपल्या माहेरी म्हणजे पंढरपूरात आलेली आहे. खरंतर यंदाच्या वर्षी पंढरीला येण्याचं तीच मन होत नव्हतं मात्र माहेरी आई जशी सणाच्या वेळी सासरी असलेल्या मुलीची माहेरी येण्याची वाट पाहत असते तसा देवसुध्दा भक्तांची वाट पाहत असतो म्हणून खुद्द विठ्ठलानेच तिला पंढरपुरला येण्यासाठी दोन चिठ्या पाठवल्याचे ती पुढील ओव्यांतून सांगते-

"पंढरीका जावू यंदा नहीना माझं मन
देव ईठ्ठलनी चिठ्ठ्या धाडील्या दोन"

पंढरीला विठ्ठल भावाच्या भेटीसाठी पायी जाणारी ही स्त्री दरकोस दरमुक्काम करीत जाते आहे. शेवाळी ता.साक्री येथू निघालेल्या या महिलेचा पहिला मुक्काम  खाकुर्डी  ता. मालेगाव येथे राहत असलेल्या तिच्या बहिणीकडे केल्याचा ती सांगते.  ( साक्री मालेगाव रस्त्यावर शेवाळी गावापासून ३०- ३५ कि.मी अंतरावर खाकुर्डी गाव आहे.) मात्र विठ्ठलाने तिला तातडीने पंढरपूरला येण्यासाठी अजून एक चिठ्ठी पाठवल्याचे ती पुढील ओव्यांतून म्हणते-

"पंढरीका जावू पयला मुक्काम खाकोडीना
देव ईठ्ठलनी चिठ्ठी धाडी दिधी तातडीनी"

श्री विठ्ठलाने या स्त्रीभक्ताला पंढरपुरास तातडीने (लवकर) येण्यासाठी चिठ्ठी पाठविल्यामुळे ती स्त्री बहिणीच्या गावाहून लगोलग पंढरपूरला आलेली आहे. आणि विठूमाऊलीच्या हया पंढरीनगरीत दररोज त्याच्या भक्तांची जी मंदियाळी असते, गर्दी असते ती गर्दी पाहून तीला जणूकाही भक्तांची गुनरी भरलेली वाटते. ( शहरात ठीकठीकाणी भाजी- पाल्याची गुनरी भरते तसी) या भक्तांच्या हाती तुळशीमाळा व मुखी हरीनामाचा गजर नित्य चाललेला असतो याचे वर्णन पुढील ओव्यांतून ती करते-

"पंढरी पंढरी ईठू रायानी नगरी
हाती तुयसीया माया नीत भरती गुनरी"

पंढरपूरच्या चंद्रभागा नदीला आलेल्या पूराच्या पाण्यातून सोयाची आरती (जिरांना) वाहून आल्याचे आणि त्या आरतीने विठ्ठलच्या मूर्तीला ओवाळल्याचे ती पुढील ओव्यांतून म्हणते-

"चंद्रभागाले वान पूर वाही वनीका आरती
सोनानी आरती ववायू ईठ्ठलनी मुरती"

पंढरपूर नगरी ही अतिशय दाट वस्ती असलेली नगरी असल्यामुळे विठ्ठलाच्या पायाशी असलेल्या चंद्रभागेच्या तीरावरही विठ्ठल भक्तांची  दाट गर्दी झालेली आहे. दाटीवाटीच्या वस्तीमुळे पंढरी नगरीला वसायला दुसरी जागा नसल्याचे ती पुढील ओव्यांतून सांगते-

"पंढरी वसी ईले वसाले नही जागा
टाय मुरदुंगी भरी गई चंद्रभागा"

अशा गर्दीमध्ये हट्टी असलेली रुख्मिणी तुळशीला खेटून  गेली आणि  त्यामुळे तुळशीच्या मंजुळा ( मंजिऱ्या) तुटून खाली पडल्याचे ती पुढील ओव्यांतून सांगते-

"रुखमिनी हाटेली गई तुयसीले खेटूनी
तुयसाबाईया मंजोया खाली पडल्या तुटूनी"

विठ्ठल मंदिराच्या दक्षिणद्वारी या ठिकाणी संत कान्होपात्रेचा अचेता देह पुरला होता त्याच जागी पुढे एक तरटीचा वृक्ष उगवला असल्याचे काही पुस्तकांमध्ये लिहीलेले आढळते. ही स्त्री देखील तिच्या ओव्यांतून एक फुलझाड असल्याचे सांगते ते फुलझाड ( पारिजातकाचे असावे) म्हणजे संत कान्होपात्रेचे झाड असून त्या झाडाला आलेली फुले दररोज राणी रुख्मिणीच्या शेजारी पडत

असल्याचेही ती सांगते. ही कान्होपात्रा कोण तर श्री विठ्ठलाची निस्सीम भक्त. शामा नावाच्या गणिकेची सुंदर मुलगी. हीन कुळात जन्माला आलेली असूनही विठ्ठलाप्रती असलेल्या आपल्या निस्सिम भक्तीने विठ्ठलाच्या हृदयात स्थान मिळवणारी. आपला देह पांडुरंगाच्या चरणी सर्मर्पित करणारी. तिची निस्सिम भक्ती पाहून पांडुरंगानेही तीला आपल्या चरणाशी ठाव दिला असल्याची एक अख्यायिका आहे. त्या संत कान्होपात्रेचा संदर्भही ती पुढील ओव्यांतून देते-

" कानूपातरानं झाड देव ईठ्ठलना मंदिरी
फुलेन गयथी रानी रुखमाना शेजारी"

विठूमाऊलीच्या भेटीसाठी निघालेली ही स्त्री एकटी जात नाही तर सोबत सासू, सासरा, दीर, जेठ, या सर्वांना सोबत घेऊन चालली आहे. खरे तर अध्यात्माच्या भाषेत सासू म्हणजे कल्पना, सासरा म्हणजे दंभ, दीर, जेठ म्हणजे काम- क्रोध हे विकार आहेत. सर्व संतांनी या विकारांना माणसाचे शत्रू मानले आहे. विठ्ठलाच्या दर्शनाला येणारा प्रत्येक विठ्ठलभक्त आपल्यात असलेल्या हया विकारांपासून मुक्त होण्यासाठी येत असतो पण ही स्त्री आपल्या ओव्यांतून सासू, सासरा, दीर, जेठ, यांना घेऊन विविध गावांजवळ या नदीचे आणि तिच्या पाण्याचे सुरेख वर्णन करतांना दिसते. कोपरगावाजवळ भिमा नदीचे विशाल पात्र पाहून ती त्या नदीपात्राचे वर्णन पुढीलप्रमाणे करते-

" पंढरीका जावू संगे ल्हिवू मना सासरा
कोपरगावपासी भिमा बाईना पसारा"

पंढरपूर जवळ असलेल्या गरसोय नावाच्या गावापर्यंत चंद्रभागेच्या पाण्याचा फूगवटा असल्याचे ती पुढील ओव्यांतून सांगते-

"पंढरीका जावू संगे ल्हिवू मना नेटं
गाव गरसोयपासी चंद्रभागाले पानी रेटं"

ते पाणी स्थिर असल्याचे ती पुढील ओव्यांतून सांगते-

"पंढरीका जावू संगे ल्हिवू मना देर
गाव गरसोयपासूनी चंद्रभागानं पानी थीर"

पंढरपूरला दीर, जेठ, सासऱ्याबरोबर ती स्त्री सासूलाही घेऊन जाते. सासू- सुना दोघीही सोबतच विठ्ठलाचा पाया पडतात ते पाहून विठूमाऊलीला कसे हसू आले ( कदाचित सासू- सुनेला एकत्रीत आलेले पाहून विठ्ठलालाही हसू आले असावे.) ते ती पुढील ओव्यांतून सांगते-

"पंढरीका जावू संगे ल्हिवू मनी सासू
पाया पडता देव ईठ्ठलले वां हासू"


अशा प्रकारे साक्री तालुक्यतील शेवाळी येथील ही एक वारकरी संप्रदायातील अशिक्षित स्त्री विठ्ठमाऊलीला भेटण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आपल्या कुटुंबातल्या सर्व मंडळींना घेऊन दश्कोस दरमुक्काम करीत पायी आलेली आहे.

**सारांश :-** खानदेश वासियांचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या लोकांचे व ओक संप्रदायांपैकी एक प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वारकरी संप्रदायाचे आराध दैवत असलेल्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठमाऊलीला भेटण्यासाठी 'ज्ञानबा तुकारामाचा' जयघोष करीत, टाळ - मृदुंगाच्या नादात नाचत माल दरमाल पायपीट करीत आषाढी एकादशीला मोठया संखेने हजर राहून हे विठ्ठलभक्त आपल्या लाडक्या विठूरायाच्या चरणाशी लीन होतात. विठूमाऊलीही आपल्या सर्व भक्तांना आपल्यात सामावून घेतो. अशा संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांचे श्रध्दास्थान असलेल्या हया आपल्या लाडक्या विठूरायाचे व पंढरपूर नगरीचे गुणगाण आाही साक्री तालुक्यातील अशिक्षित स्त्रीया सहजपणे गातांना दिसतात.

**ओव्यांची प्राप्ती :-**

कै. मंदोदराबाई श्रीराम साळुंके मु. पो. शेवाळी, ता.साक्री, जि.धुळे.

# DIGITAL LITERACY AND WOMEN EMPOWERMENT




Chief Editor

Prin. Dr. Ashok P. Khairnar

# DIGITAL LITERACY AND WOMEN EMPOWERMENT

**Chief Editor**
Prin. Dr. Ashok P. Khairnar
J.K. Shah Adarsh College,
Nijampur-Jaitane

**Editors**
Dr. Kantilal D. Sonawane
Prof. Atish S. Meshram
Dr. Priyanka P. Sulakhe

# Digital Literacy and Women Empowerment

©Reserved

**ISBN :** 978-81-951217-4-8

**Publisher & Printer :** Yogeshwar L. Jalgaonkar

Dnyanpeeth International Publisher

| | | |
|---|---|---|
| **Aurangabad** | : | Banjara Colony, Near Datta Mandir, Bahadarsingpura, Aurangabad Dist. Aurangabad - 431001 Contact : 9823724705 |
| **Nandurbar** | : | Manik Chowk, Opp. Hutatma Shirishkumar Smarak, Nandurbar Dist. Nandurbar - 425412 Contact : (02564) 220155, 9175510724 |
| **Email** | : | dnyanpeeth.publisher@gmail.com |
| **First Edition** | : | 31 December 2021 |
| **Type Setting** | : | Rudra Creations, Nandurbar |
| **Price** | : | 300/- |


**Disclaimer :** The Authors are solely responsible for the contents of the papers compiled in this volume. The Editors or Publishers do not take responsibility for the same in any manner. Errors if any are purely unintentional and readers are requested to communicate such error to the Editors or Publishers to avoid discrepanices in future.

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying (xerox copy), recording or otherwise, without the prior permission.

# INDEX


- **A Study on the Implementation of Digital Initiative for Women Empowerment** ....................09
  - Mrs. Dakshayini E.
- **Digital Dissimilarity: Looking Gender-wise into the Mirror**.............13
  - Dr. Shailesh Jagdish Bahadure
- **Digital Literacy For Women Empowerment**......................................19
  - Dr. Alpana Vaidya
- **E-Governance and Women**.............................................................22
  - Dr. Sudhir Kumar Srivastava
  - Mr. Pankaj Laxman Sonawane
- **Digital India and Women Empowerment**...........................................27
  - Vijay Bhaidas Bachchhao
- **Empowering Rural Women through Digital Literacy, Global Market & Local Self Government**..........................................31
  - Dr. Pradip G. Sonawane
- **Dalit Women in Digital World : Review of Article 15 Cinema**.......38
  - Dr. Sidhartha B. Sawant
- **Empowering Woman in India with Digital Drive: A Case Study**.......43
  - Dr. Gajanan P. Patil
- **Depiction of Empowered Women Characters in the Novel of Ashok Banker**.............................................................49
  - Dr. Dnyaneshwar S. Chavan
- **Role of Women as an Environmentalist in Ruskin Bond's Short Stories**....................................................................52
  - Dr. Nilesh Bhateshwar Malichakar

- **A Study of Different Scheme of Women Entrepreneur Development for Women Empowerment**.............................................55
  - Mr. Sachin Karbhari Jadhav
- **Empowerment of women through Digital Literacy**.........................62
  - Anju Ashok Pakhale
- **Education : Guiding Light to Women Empowerment**....................69
  - Mr. AjabraoRavji Ingle
- **The Role of Women in Economic Development**.................................73
  - Dr. Jyoti Sahadev Wakode
- **लिंगभावात्मक जमातवाद आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न**..................................76
  - डॉ. पी. यु. नेरपगार
  - प्रा. भुषण अहिरराव
- **डिजीटल भारत आणि महिला सशक्तिकरण**.......................................................83
  - प्रा.डॉ. मोहन दे. वानखेडे
- **डिजिटल इंडिया आणि महिला सबलीकरण**........................................................89
  - प्रा. डॉ. महेंद्र पाटील
- **डिजिटल साक्षरता उपक्रम आणि महिला सक्षमीकरण**........................................95
  - प्रा.डॉ. वसुमती पी. पाटील
- **महिलांची सुरक्षितता व डिजीटल तंत्रज्ञानाची वास्तविकता**..................................98
  - प्रा.डॉ. अरुणा व्ही. नेरे
- **Women Literacy in Digital World**................................................102
  - डॉ.संतोष शिवकुमार खत्री
- **डिजीटल साक्षरतेत स्त्रियांचे प्रमाण व आरोग्य सेवांचा अभ्यास**..........................106
  - प्रा.वासुदेव गोविंदा मेश्राम

- **आदिवासींच्या शैक्षणिक विकासात शासकीय योजनांचे यशापयश**......................111
  - बाळासाहेब नलावडे
- **महिला सबलीकरणात डिजीटल तंत्रज्ञानाची भुमिका व कार्य**............................117
  - प्रा. डॉ. एस. आर. गोवर्धने
- **संगणकीकृत भारत व महिला सबलीकरण**......................................................121
  - श्री. अमृत नामदेव पाटील
- **डिजीटल बँकिंग व महिला सक्षमीकरण**......................................................126
  - राठोड लक्ष्मण महारू
- **डिजीटल इंडिया : ग्रामीण भागातील समस्या व उपाय**.................................129
  - प्रा. डी. एल. पावरा
- **साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ओव्यांतून प्रकट झालेले स्त्री जीवनाचे चित्रण**......................................................132
  - डॉ. प्रकाश श्रीराम साळूंके
- **महिला सक्षमीकरण : ऐतिहासिक-राजकीय सिंहावलोकन**...............................136
  - प्रा. शरद बाबुराव सोनवणे
- **स्त्री सबलीकरण व डिजिटल इंडिया**..........................................................141
  - डॉ. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे
- **डिजीटल इंडिया सुनहरे भारत का भविष्य**..................................................146
  - प्रा. आबासाहेब माणिकराव देशमुख

# साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ओव्यांतून प्रकट झालेले स्त्री जीवनाचे चित्रण

**डॉ. प्रकाश श्रीराम साळूंके**
मराठी विभाग प्रमुख,
सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, साक्री ता. साक्री, जि. धुळे

**प्रास्ताविक :**

साक्री तालुक्यात बोलल्या जाणाऱ्या अहिराणी बोलीत गायल्या जाणाऱ्या ओवीगीतांचे समृध्द दालन आहे. त्या ओव्यांतून लोकजीवनाचे दर्शन घडते. विविध प्रकारचा आशय या ओव्यांतून व्यक्त होत असतो. या ओव्यांच्या निर्मितीत स्त्रीयांचा मोठा वाटा आहे. खरेतर ह्या ओव्या म्हणजे स्त्रीधनच आहे. हे स्त्रीधन साक्री तालुक्यातील अशिक्षीत स्त्रीयांनी मौखिक परंपरेने आज देखील जतन केलेले आहे. या ओव्यांतून स्त्री जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकलेला आहे. मानवी विविध नात्यांना या ओव्यांमध्ये विशिष्ट स्थान आहे. या नात्यांमधील विविध भूमिका, कर्तव्य, पावित्र्य त्यातील सुख-दुःख, राग-लोभ, वात्सल्यभाव, आदरभाव, स्नेहभाव अशा अनेकविध भावनांच्या हृदयस्पर्शी अविष्कार या ओव्यात झालेला आढळतो. कौटुंबिक नात्यातील विविध भावसंबंधांचे अत्यंत भावस्पर्शी चित्रण या ओव्यांमध्ये क्लेले असते. म्हणून नात्या-नात्यातील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी आजही टिकून आहे. अंतरीच्या उमाळ्यातून या ओव्यांची निर्मिती झालेली असल्यामुळे त्या ओव्या भावस्पर्शी आहेत.

साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ह्या ओव्यांमध्ये माता-पित्याचे स्थान अनन्य साधारण आहे. आई-वडीलांविषयी कृतज्ञताभाव आणि प्रेमभाव या ओव्यातून व्यक्त होतो. स्त्री ही लग्न होईपर्यंत आई-वडीलांकडेच असते त्यावेळी आई-वडीलांनी तिला दिलेले प्रेम, माया, वात्सल्य तिच्यावर क्लेले संस्कार या गोष्टी ती कदापी विसरू शकत नाही म्हणून वडीलांना ती 'समुद्राची' उपमा देते विशालकाय समुद्रासारखे हृदय असलेला बाप सर्व सृष्टीमध्ये दुसरा कोणी नसतो हे ती पुढील ओव्यातून सांगते -

"समदीर समदीर, समदीर सारखा साठ जई
घाली सिरष्टी पायंदये, आयबा सारखं कोणी नई"

मात्र मुलीचे लग्न झाल्यावर तिच्या बापापेक्षा तिला पतीचे राज्य हे लाखमोलाचे असते. कारण पतीच्या राज्यात म्हणजे 'राम' राज्यात तीला सर्व अधिकार प्राप्त झालेले असतात. त्यातच ती सुखी असते आणि त्या सूखाचे वर्णण ती पुढील ओव्यातून करते -

"भरतानं राज, कोरा रांजननं पानी
ऊपसू दोन्ही हाते, माले वरजेना कोनी"

नवऱ्या घरची परिस्थिती गरीबीची जरी असेल तरी गरीबीत मी माझा संसार सुखाने चालवीन म्हणन ती देवाला विनंती करते की, हे देवा, माझी परिस्थिती जरी गरीबीची असेल तरी चालेल पण माझ्या पतीचे आयुष्य वाढू दे अशी विनंती ती पुढील ओव्यांतून करते -

"आरे आरे देवा माले दुबय राहू दे
कपायना कुकुमना जलमे जावू दे"

मुलीचे लग्न कितीही चांगल्या श्रीमंत घरातील मुलाशी लाऊन दिले मात्र तीचं नशिबच खोट असेल तर तीच्या आई-वडीलांचा काय दोष? हे ती पुढील ओव्यातून सांगते-

"दैवं दैवं करी, दैवं चंदननी खाप
खोटा नशिबले, काय करथी माय-बाप"

मात्र तिचे सासर श्रीमंत असेल तर तिचाही हावरटपणा वाढून जातो पण कुठेही जा सर्वीकडे सारखे असते याचे वर्णन ती पुढील ओव्यातून करते -

"नेका करु नारी, नको करु मन-मनं
जठे जाशी तठे, पयसाले पाने तीन"

आपल्या जवळील धन-दौलतीला कोणीच विचारत नाही मात्र आल्या-गेल्या पाहुण्यांचा आदर सत्कार केल्यास आपली कीर्ती वाढते हे ती पुढील ओव्यातून सांगते-

"कोणी नई सोदत, धन संपत्ती अती रेती
अम्रीत भोजन, दोन घासनी किरती"

आपले धनदौलत संपत्ती ही आपली मुलेच असतात म्हणून ती देवाकडे मुलगा होन्याची विनंती करते त्यावेळेस ती पुढील ओव्यात म्हणते -

"दिसी रे देवाजी, संपत्तीना सरवा साज
आंगनले गाडाघोडा, वसरीले बायराज"

पोटचा मुलगाच आई-वडीलांना म्हातारपणी सांभाळतो, कुगाचेच दीर-जेठ कुगालाच होत नाहीत उलट ते आपल्या धन-संपत्तीचे, इस्टेटीचे वाटेकरी असतात हे ती पुढील ओव्यातून सांगते -

"पोरे पुतरू महिना फार, पोटे पुतरु महिमा फार
कोना नईथीन देरजेठ, धन-संपत्तीना हिस्सेदार"

मात्र देवाकडे नवसाने मागीतलेला हा मुलगा लग्न झाल्यावर जेव्हा पत्नीचे ऐकून आईला हिनकस वागवणूक देतो तेव्हा ती मुलाला स्पष्टेपणे जाबही विचारते -

"माय माय करी, मावन्या माया किती
लेक तुले न्हानाना म्होटा कया, तवय तुम्ही आस्तुरी कोठे व्हती?" .

नऊ महिने पोटात वाढवले सहा महिने मांडीवर खेळवले याची आठवणही ती त्याला करून देतांना म्हणते -

"माले जलम दिधा, माय मनी मंडोधर
नव महिना वंझ वागं, सव महिना मांडीवर"

मुलाला वेळप्रसंगी जाब विचारणारी ही आई, आयुष्याच्या शेवटी उतारवयात थकलेली आहे. तिला आजारपण आलेले आहे. त्यावेळी तीच्या जीवाच्या वेदना कोणी जाणून घेत नाही म्हणून देहरूपी नगर सोडून माझा जीव देवाघरी निघून जायला पाहीजे असे तिला वाटते यांचे वर्णन ती पुढील ओव्यातून करते -

"झाडले भिरूड, झाड टाकवा तोडूनी
उबगीला जीव, जावा नगर सोडूनी"

स्त्री मेल्यावर तीला शेवटची बोळावन भावाकडची असते मात्र ती चांगली आण, माझ्या भाऊबंदकीतल्या आयाबाया पाहतील त्यांनी बोळावणीला नाव ठेवायला नको माझ्या माहेरचे नाव जायला नको असे ती भावाला पुढील ओव्यातून सांगते -

"निदाननी येये, धाव घालसी बंधुराया
सरती बोयावन जोथी, मन्या नगरीन्या बाया"

ज्या पतीच्या छत्रछायेत ती आपले सर्व आयुष्य घालवते तोच पती तीच्या अंतयात्रेत तीच्या प्रेतावर छत्री धरून सावली देण्याचे काम करतो म्हणजे स्त्रीच्या आयुष्यात पतीच महत्त्वाचा असतो याचे मार्मिक वर्णन ती पुढील ओव्यात करते-

"निदाननी येये, किडीबाईले फुटा घाम

आग्या खांद्या देर जेठ, वर छतरी धरे राम"

अशा प्रकारे अहिराणी बोलीच्या ओव्यातून स्त्री मनाचे, तिच्या भावभावनांचे व जीवनाचे दर्शन घडते. तसेच सक्षमीकरणाची संकल्पना व्यक्तिच्या मानसिकतेस जोडल्यास त्या-त्या काळातील स्त्रीयांनी विविध प्रकारच्या संकटांशी स्वबळावर संघर्ष केलेला आहे. सदर संघर्षाची जाणीव ह्या ओव्यातून पदोपदी जाणवते.

**ओव्यांची प्राप्ती :**

श्रीमती मंदोदराबाई श्रीराम साळुंके, रा. शेवाळी, ता. साक्री, जि. धुळे.

*****